। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २९९ वा । शनिवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com
(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज यांच्या पादुकांच्या दर्शनास तुफान गर्दी






**लातूर/प्रतिनिधी :** संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज यांच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी शनिवारी सकाळी लातूरमध्ये तुफान गर्दी भाविकांची दिसून आली. भाविकांनी पादुकांचे दर्शन घेतले असून धन्यता मानली. श्री सिध्देश्वर मंदीरात संतांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले असून हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टीही करण्यात आली. 'हर हर महादेवाची गर्जना' यावेळी करून संतांचा जयजयकार करण्यात आला. अनेक भाविकांच्या हाती टाळ-मृदंगासह भजन गायीले जात होते.

लातूरमध्ये पादुका दर्शनासाठी परराज्यातून अनेक भाविक दाखल झाले आहेत. शहरातील रस्ते भाविकांनी तुडूंब भरले, भक्तीमय, ज्ञानेश्वर-तुकारामांच्या गजराने शहर दुमदुमले. लातुरात भाविकांसाठी पाण्याची व नाष्ट्याची सोय केली गेली होती. शनिवारी लातुरात संतांचा मेळावा जणू भरलाच होता असे चित्र दिसून आले. सर्वत्र ज्ञानेश्वर-तुकारामाचा गजर कानी पडत होता. यावेळी महिला भाविकांची संख्या अधिक प्रमाणात दिसून आली.

### दिल्लीत अतिरेकी हल्ल्याचा कट; दहशतवाद्यांच्या निशाण्यावर प्रमुख मंदिर आणि मार्केट, अलर्ट जारी

**नवी दिल्ली:** राजधानी दिल्लीत सुरक्षा यंत्रणांनी हाय अलर्ट जारी केला आहे. गोपिनय माहितीनुसार, दिल्लीतील चांदणी चौकातील एका मंदिरासह भारतातील प्रमुख शहरांमध्ये दहशतवादी हल्ल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लाल किल्ला, चांदणी चौक परिसरातील मंदिरे लष्कर-ए-तैय्यबाच्या निशाण्यावर असल्याची शंका व्यक्त करण्यात येत आहे.

## लातूरच्या ट्युशन एरिया परिसरात पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन

### मोटार वाहन कायद्याच्या ८६ केसेस, ५८,५०० रुपये दंड व ७ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर हे राज्यभरात शैक्षणिक पॅटर्नसाठी प्रसिद्ध असून दरवर्षी हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी येथे दाखल होतात. ट्युशन एरिया परिसरात सायंकाळी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेस बाधा येऊ नये व कोणतीही असामाजिक प्रवृत्ती डोके वर काढू नये, यासाठी लातूर पोलिसांकडून सातत्याने विशेष मोहिमा राबविल्या जातात.

दिनांक २०/१२/२०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७.०० वा. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशानुसार व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ट्युशन एरिया परिसरात अचानक कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. या मोहिमेत स्वतः पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून रस्त्यावर उतरून कारवाईवर देखरेख ठेवली. उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या समन्वयाने ही कारवाई पार पडली. सदर मोहिमेत शिवाजीनगर पोलीस ठाणे, गांधी चौक पोलीस ठाणे, विवेकानंद चौक पोलीस ठाणे, दामिनी पथक व दंगा नियंत्रण पथकातील एकूण ९ पोलीस अधिकारी, ६० पोलीस अंमलदार व होमगार्ड सहभागी झाले होते. ट्युशन एरियातील मुख्य रस्ते, गल्ली-बोळ, चौक व विद्यार्थ्यांची वर्दळ असलेली ठिकाणे यांचे संयुक्त निरीक्षण करण्यात आले. विनाकारण जमाव, संशयास्पद हालचाली, विद्यार्थ्यांना त्रास देणारे व्यक्ती यांच्यावर विशेष लक्ष ठेवण्यात आले. संशयितांची नोंद, ओळख पडताळणी व आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान - मोटार वाहन कायद्यान्वये ८६ केसेस दाखल करून एकूण ५८,५००/- दंड वसूल करण्यात आला असून २ फटाका सायलेन्सर जप्त करण्यात आले आहे तसेच विनाकारण फिरणे, विद्यार्थ्यांना त्रास देणे, गुंडगिरीची प्रवृत्ती व गैरवर्तन आढळलेल्या ७ जणांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

ही कारवाई ट्युशन एरियामध्ये सतत बेताल वर्तन करणाऱ्या व विद्यार्थ्यांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या असामाजिक तत्त्वांवर वचक बसविण्यासाठी करण्यात आली आहे. लातूरमध्ये शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना भयमुक्त, सुरक्षित आणि शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य हेतू आहे. पोलिसांकडून पुढील काळातही अशाच प्रकारच्या अचानक व व्यापक मोहिमा राबवून असामाजिक हालचालींवर आळा,गुन्हेगारी प्रवृत्तीचे निर्मूलन,विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण या दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न केले जाणार आहेत.

ट्युशन परिसरात गैरवर्तन, गुंडगिरी अथवा विद्यार्थ्यांना त्रास देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कडक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेवर कोणतीही तडजोड केली जाणार नाही. लातूर पोलीस दल विद्यार्थी सुरक्षेसाठी कटिबद्ध असून, शैक्षणिक वातावरण अबाधित राखण्यासाठी सदैव सज्ज आहे.

## अभाविप तर्फे मशाल यात्रेद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन




**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूर महानगराच्या वतीने १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभाविप कार्यालय ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापर्यंत भव्य मशाल यात्रा काढण्यात आली. देशभक्तीपर घोषणा आणि शिवगर्जना देत विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदवला.

या मशाल यात्रेत लातूर जिल्हा संयोजक यश आरिकर, सहसंयोजक भागवत बिरादार, महानगर सहमंत्री शुभम क्षीरसागर,फार्माव्हिजन प्रांत संयोजक बालाजी हत्ते यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या शौर्य, पराक्रम व राष्ट्रनिष्ठेच्या आदर्शांचे स्मरण केले. तरुणांनी शिवरायांच्या विचारांचा जागर करत समाजात राष्ट्रभक्ती आणि संघटनबळ वृद्धिंगत करण्याचा संकल्प व्यक्त केला.

### प्रभात किरणे

मन मध्ये बाळगता
अभिलाषा वाढत जाई,जाते
अखंड आशा नसे कृती
जोड पदरी निराशा दुःखाचे
मेघ दाटती दाही दिशा
– इंजि. नागनाथ
कलवले, लातूर

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



अमेरिकेच्या सर्वोच्च
न्यायालयाने
ट्रम्प टॅरिफ रद्द केले...

### चिमटा दयाचा



लातूरच्या ट्युशन एरियात
पोलीसांनी कारवाई केली आहे !
गल्ली-बोळात मात्र
दुर्लक्ष होत आहे !!
आडुशाला लैला-मजनूँचा
संवाद वाढला आहे

## पालकमंत्र्यांनी घेतला जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा !

# गुन्हेगारांची गय नको; अवैध मद्यविक्री, अंमली पदार्थ विक्री रोखा - पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

➤ पोलिसांसोबतच राज्य उत्पादन शुल्क, अन्न व औषध प्रशासनाने दक्ष राहण्याच्या सूचना
➤ अंमली पदार्थांची विक्री आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावीत. सराईत गुन्हेगार, तसेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या प्रत्येक व्यक्तींवर कठोर कार्यवाही करावी. शहरातील ट्युशन एरियासह शाळा, महाविद्यालय परिसरात विनाकारण फिरणाऱ्या, दहशत माजविणाऱ्यांविरुद्ध आवश्यक कार्यवाही हाती घेण्याच्या सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज दिल्या.

लातूर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्यासह जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

पोलिसांनी शहरातील विविध भागात अचानक कॉम्बिंग ऑपरेशन राबवून अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींवर, सराईत गुन्हेगारांवर कारवाई करावी. विशेषतः शहरातील वसतिगृहे, ट्युशन एरियासह इतर भागात सातत्याने पोलिस गस्त सुरू करावी. जिल्ह्यातील अवैध दारू विक्रीला पायबंद करण्यासाठी पोलीस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्त मोहीम हाती घ्यावी. अंमली पदार्थ, नशा करण्यासाठी वापरली जाणारी औषधे याची जिल्ह्यात विक्री होणार नाही, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने तातडीने मोहीम हाती घ्यावी. ज्या परिसरात अवैध दारू, अंमली पदार्थ विक्री होत असल्याचे निदर्शनास येईल, त्या क्षेत्राच्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे पालकमंत्री श्री. भोसले यांनी सांगितले.

गंभीर प्रकारचे गुन्हे दाखल असलेल्या गुन्हेगारांवर तडीपारीची कार्यवाही करावी. कोणत्याही गुन्हेगाराची गय न करता जिल्ह्याच्या कायदा व सुव्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. बेकायदेशीरपणे शस्त्रास्त्रे बाळगणाऱ्या, अशी शस्त्रास्त्रे विक्री करणाऱ्या



व्यक्तींचा शोध घेवून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी दिल्या. तसेच युवक, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना चुकीच्या मार्गापासून परावृत्त करण्यासाठी जनजागृती करावी, असेही त्यांनी सांगितले.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड यांनीही यावेळी कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना दिल्या.

जिल्ह्यात एमपीडीए अंतर्गत कार्यवाही जलद गतीने करण्यात येत आहे. तसेच शाळा, महाविद्यालयातील प्राचार्य, हॉस्टेल चालक यांच्या मदतीने शहरात लवकरच विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी मोहीम राबविण्यात येईल, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## सरकाराने कृषी व पर्यावरणास महत्त्व द्यावे

सरकारने कोणत्या बाबीला महत्त्व द्यायला पाहिजे असा विचार केला तर कृषी व पर्यावरण!ला कारण ह्या दोन बाबी महत्त्वाच्या आहेत. राज्य व देशाला प्रगतीपथावर घेवून जाणाऱ्या आहेत. राज्यातील शेती ही निसर्गावर आवलंबुन आहे. निसर्ग साथ देत नाही. चीन जेंव्हा स्वतंत्र झाला त्याने पहिल्यांदा अन्न धान्य बाबतीत सक्षम होण्याचा प्रयत्न केला. अन्नधान्य प्रचंड प्रमाणात पिकविण्याकडे लक्ष दिले. त्यांनी चीनमधील जेवढ्या नदी, नाले होते त्यातील पाणी सर्वत्र फिरविले. याचा उपयोग शेतीसाठी केला. कोठेही जावा पाणीच पाणी दिसून येते. पावूस कमी पडला तरी भूमी हिरवीगार दिसून येते. त्याची प्रथम प्राधान्य शेतीसाठी दिले. शेतीला पुरक बाबीची सोय केली. त्यानंतर इतर संशोधनात, खेळाकडे लक्ष दिले. चीनचे लोक बसे नाही. एतखाऊ नाहीत. प्रत्येक जन काम करतो. कामाचा मोबादला घेत असतो. कामात मग्न असणारी मंडळी असल्याने बाजारात खरेदी करण्यासाठी त्यांना सुट्टी द्यावी लागते. पुरूष अवजड तर महिला हालके काम करतात. चीन आपला मित्रराष्ट्र नाही तर शत्रु राष्ट्र आहे तरी त्याचे गुणगाण कशासाठी? जे चांगले आहे ते इतराकडून घ्यावे, असा संदेश आपल्या संतांनी दिला आहे. इतराकडे जे चांगले आहे ते घेण्यात काहीच हरकत नाही. त्यामुळे आपल्या राज्यात जेवढे काही पाण्याचे स्त्रोत असतील त्याचा पुरेपूर उपयोग करून घेतला पाहिजे. माजी पंतप्रधान अटलबिहारी हे एकमेव दुरदृष्टीचे नेते होवून गेले. त्यांनी नदीजोड प्रकल्प हाती घेतला तो पुर्ण होवू शकला नाही. त्याच प्रमाणे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री त्यांनी ओळखले होते की, देशासाठी दोन भुजा मजबुत असल्या पाहिजेत. एक जवान व दुसरा किंसान, म्हणून त्यांनी जय जवान, जय किसानाचा नारा दिला. या दोन बाबीकडे कालांतराने दुर्लक्ष केल्याचा परिणाम मोठा दिसून येत आहे. आज गरज कशाची आहे. पाणी व बदलते हवामानामुळे येत असलेले संकट! किमान याबाबीचा विचार केला पाहिजे. देशातील जनतेनी विचार करावा की, पावसाचे पाणी दरवर्षी भरपूर पडते मात्र ते वर्षभर का टिकविता येत नाही. यामागील कारणे कोणती आहेत. पाणी वापरापेक्षा वाया घालविणारी मंडळी अधिक दिसून येते. पावसाळ्या निसर्ग गरजेपेक्षा अधिक पावूस देतो, डोंगरावरील पाणी वाया जाते, तेच जर डोंगराच्या पायथ्याशी जर साठविण्यासाठी योजना असती तर? मुळात पाण्याची कमतरता नाही असे नाही तर नियोजन नाही हे लक्षात घेतले पाहिजे. केवळ चर्चा होते. प्रत्यक्षात नियोजन होत नाही. गाव तेथे ओढा होताच, आता तो बुजला गेला आहे. पाणीची साठवणुक हीच जमीनीत मुरणारी प्रक्रिया आहे. जमीनीत पाणी साठ्यात वाढ करावयाची झाली तर शेत तळे आवश्यक आहे. हॉर्वेस्टींग करण्याची गरज आहे. पाणी साठी वरचेवर कमी होत आहे. पाण्याची पातळी खोलवर वर्षानुवर्षे जात आहे. असे असले तरी प्रत्यक्षात गांर्भीयाने कोणी घेत नाही. शहरात किती प्रदुर्शन वाढत आहे. वाढती कारखानदारी, असंख्य चार व दोन चाकी गाड्या, धुळ आदि कारणामुळे निसर्गात प्रदुर्शन वाढत आहे. त्यामुळे धुर्धर रोग होत आहे. पुर्वीचे मधूमेह व रक्तदाबाचे प्रमाणे, कर्करोगाचे प्रमाण कमी होते. पुर्वी असे रोग नव्हते तर आज कोणत्या कारणामुळे उद्भवलेले आहेत. याचा विचार केला पाहिजे. शुद्ध हवेसाठी मार्ग शोधावा लागतो. जी काही परिस्थिती निर्माण झाली याला जबाबदार कोण आहेत तर मानव आहे. शेतीची गुणवत्ता घसरत आहे. याला जबाबदार कोण आहेत. रासायनिक खताचा बेसुमार वापर कोण करीत आहे. त्यामुळे आरोग्य धोक्यात येत आहे याला जबाबदार नागरिक आहेत. त्यात पाल्याभाज्या, फळे खातो ते अधिकाअंश हे रासायनिक प्रक्रियाकरून पिकविलेल्या आहेत हे लक्षात येत असे नाही तरी ते खाल्ले जाते. दुसरा पर्याय समोर नसतो. त्यामुळे पहिल्यादा सरकारने या बाबत विचार केला पाहिजे. नागरिकांनी सावध झाले पाहिजे. नागरिकांनी जरा प्रयत्न केला तर आरोग्य सदृढ होवू शकेल. देशाची खरी संपत्ती ही देशातील निरोगी नागरिक समजले जातात. देशातील नागरिक रोगी असतील तर ते स्वत:चे किंवा देशाचे संरक्षण कसे करतील. या बाबीचा विचार केला पाहिजे. त्यामुळे भारतीय इतिहास व संस्कृती प्राचीन आहे. वैदिक संस्कृतीचे पाईक आहोत. असे असताना पाश्चमात्य संस्कृतीचा स्विकार केल्याने सत्यानाश झाला आहे. त्या-त्या देशासाठी ती संस्कृती योग्य असते. निसर्ग, हवामान, राहाणीमान यानुसार ती संस्कृती असते तीच भारतीय स्विकारणार असतील तर ते योग्य नाही. भारतीय मंडळी विचारी आहे. जगात भातरतीय लोक आहेत. आयटी क्षेत्रात प्रगती केली आहे. जगात भारतीय मंडळी बुद्धीमान आहे म्हणून अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स आदि किती देशात भारतीयांना मानाच्या स्थानी विराजमान झाल्याचे दिसते. त्यामुळे सध्याला जटील प्रश्न कृषी क्षेत्रात प्रगती कशी साधता येईल, दुषीत वातावरणावर मात कशा प्रकारे करता येईल या दोन बाबीच्या आहेत. विचार करण्यापेक्षा प्रत्यक्षात कामाला लागले पाहिजे. आपल्या पुर्वजांनी ज्या सुचना दिल्या आहेत त्यानुसार वागावे लागणार आहे. पुर्वीची जीवन शैली योग्य होती. केवळ पैसा कमविणे हे ध्येय नाही. पैसा कमवावा. पुरूषार्थाने पैसा धन कमवावे मात्र देशासाठी काही तरी केले पाहिजे. सामाजिक बाबीचा विचार केला पाहिजे. केवळ चर्चा करून भागणार नाही तर प्रत्यक्षात काम करावे लागणार आहे. चीन झुरले खाणारा आज सर्वक्षेत्रात पुढे आहे. का पुढे गेला. मुळात आपण आपल्या संस्कृती पासून दूर केलो आहोत. श्रद्धेपेक्षा अंधश्रद्धेत आडकिवले जात आहे. सध्याला वाढत्या उष्णतेचा परिणाम हा पाणी टंचाईवर होणारा आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात भरारी घ्यावयाची झाली तर पाणी आवश्यक आहे. पाणी सर्वत्र राज्यात कशाप्रकारे फ़िरवता येईल याचा विचार केला पाहिजे. पाणी टंचाई निर्माण झाली व निसर्गाचा समतोलपना बिघडला तर मोठे संकट उभा राहील, त्यावेळी मात करणे अशक्य होईल, त्यामुळे राज्य सरकारने विचारपुर्वक आता पासून पावले उचलण्याची गरज आहे. सक्तीने वागावे लागेल. कायद्याने व कडक भुमिकेने चालावे लागेल, तरच समाधानाचे दिवस येतील. कृषी क्षेत्रात भरारी घ्यावी लागेल. त्याला लागणाऱ्या पुरकबाबीचा विचार करावाच लागेल. पर्यावरणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

# महावितरणच्या शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने विविध उपक्रमांनी शिवजयंती उत्साहात साजरी



**लातूर/प्रतिनिधी :** महावितरणच्या शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने दरवर्षीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठया उत्साहात विविध उपक्रम राबवून साजरी करण्यात आली. याप्रसंगी शिवशाहीर निशिगंधा संतोष साळुंके यांचा आम्ही जिजाऊंच्या लेकी हा शिवचरीत्र पांवाडे व स्फुर्ती गितांचा कार्यक्रम साजरा झाला. तत्पुर्वी परिमंडल कार्यालयात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांच्या हस्ते शासकीय इतमामात शिवजयंती साजरी करण्यात आली.

विद्युतभवन येथे संपन्न झालेल्या शिवजन्मोत्सवाच्या अध्यक्षपदी उपस्थित राहिलेले मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, कार्यकारी अभियंता सर्वश्री अनिरूध्द घाटगे, सुबोध डोंगरे, नागेश देशमूख, रविंद्र महाव्दार, सतिश कुलकर्णी, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष सुनिल कापसे यांच्या प्रमूख उपस्थितीत संपन्न झालेल्या शिवजयंती उत्सवात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवून तमाम भारतीयांना आत्मभान दिले. गुलामीचे जीवन जगणाऱ्या मराठी माणसांच्या मना-मनात स्वराज्याचे स्वप्न धगधगत ठेवून स्वाभिमान जागवण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. सर्वगुणसंपन्न अशा या कल्याणकारी राजाचे नाव घ्यायचे असेल तर त्यांच्यासारखे गुण अंगी बाळगून दैनंदिन आचरणात आणावे असे विचारही मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी व्यक्त केले. याप्रसंगी प्रमूख अतिथींच्या हस्ते वेशभूषा स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळालेल्या कु. साईशा धायगुडे, व्दितीय ठरलेला राजवीर गाडे, तसेच तिसरा आलेल्या रूद्रांश कदम यांचा स्मृतीचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. समितीच्या वतीने विद्युत भवन परिसरात शिल्पकार गणेश आगावणे यांनी तयार केलेल्या महावितरणचा कणा म्हणजेच लाईनमनच्या भव्य शिल्पाचे मुख्य अभियंता श्री बुलबुले यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

जयंती उत्सवाचे सुत्र संचालन प्रमोद कांबळे यांनी केले तर प्रास्ताविक अभियंता राहूल गाडे यांनी केले. तसेच आभार श्री अंजनवतीकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या सुरवातीला सामाजिक कर्तव्य म्हणून आणि समाजाचे ऋणाची परतफेड करावी या भावनेतून दरवर्षी प्रमाणे शिवजन्मोत्सव समितीचे प्रमूख अभियंता राहूल गाडे यांच्या संकल्पनेतून ५६ रक्तबॅगाचे संकलन करण्यात आले. शिवजन्मोत्सव यशश्वी करण्यासाठी प्रशांत जाधव, विवेकानंद स्वामी, अमोल जाधव, प्रमोद दुधाळे, धनंजय जाधव, शैलेश पाटील, सुदर्शन बोळगावे, अमित शृंगारे, गणेश नरदेव, विक्रम लोंढे, रविकीरण जेवरीकर, राहुल गाडे, जय सावंत, अजीत जैन, सुनिल कापसे, शकील लदाफ, रितेश साबदे, बलराम जाधव, सुधाकर साठे, केतन मोरे, धनश्री शिंदे, सोमेश्वर गुजराथी, पवन कदम, अमित शृंगारे, सचिन सूर्यवंशी, ईश्वर देशमुख, शकील लडाख, अंजनवतीकर, नवनाथ मोरे यांनी तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले

# जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर तुम्ही तुमच्याशी स्पर्धा करा - श्रीमती मालती श्रीधरन

### – स्व पासून सुरुवात करून शिवरायांनी रयतेचे राज्य स्थापन केले : रवींद्र मालुसरे
### – आयकर भवनात भव्य शिवजयंती साजरी




**मुंबई/प्रतिनिधी :** दहावी बारावीची परीक्षा म्हणजे तुमच्या स्वप्नांकडे नेणारी पहिली मोठी पायरी असते! तुमच्या मेहनतीचा, जिद्दीचा आणि आत्मविश्वासाचा हा खरा कस पाहणारा क्षण असतो. आतापर्यंत केलेला अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि आई-वडिलांचे आशीर्वाद तुमच्या सोबत आहेत म्हणून निर्धास्तपणे आणि सकारात्मक विचारांनी परीक्षा द्या. लक्ष केंद्रित करा आणि आत्मविश्वासाने पेपर लिहा. प्रत्येक प्रश्नाला शांतपणे सामोरे जा, स्वतःवर विश्वास ठेवा आणि तुमचे योगदान सर्वोत्तम द्या. तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी ही परीक्षा यशाची नवी दारे उघडो, अशा शुभेच्छा प्रधान मुख्य आयकर आयुक्त मुंबईच्या श्रीमती श्रीमती मालती श्रीधरन यांनी दिल्या. आयकर विभाग लोकाधिकार समितीच्या वतीने चर्चगेट येथील मुख्य कार्यालयात ३९६ वी शिवजयंती आणि विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होत्या. यावेळी व्यासपीठावर

आयकर आयुक्त अंकुश कपूर साहेब, आयकर आयुक्त मारूती मद्देवाड साहेब, उप आयकर आयुक्त निरज अग्रवाल साहेब, अतिरिक्त आयकर आयुक्त प्रीतम तुरेवार साहेब, मराठी वृत्तपत्र लेखक संघांचे अध्यक्ष आणि नरवीर तानाजी - सूर्याजी मालुसरे यांचे वंशज रवींद्र मालुसरे, आयकर लोकाधिकार स्थानिय समितीचे कार्याध्यक्ष विकास मोरे, महासचिव मुकुंद परब, कोषाध्यक्ष सतीश घाणेकर उपस्थित होते.

आपण आपल्या आवडत्या क्षेत्रात जर काम करायचे ठरविले तर नक्कीच यश मिळते. कोणी अभ्यासात हुशार असते तर कोणी खेळात अव्वल असतो. त्यामुळे तुम्ही तुमच्या आवडत्या क्षेत्रात काम केले तर यश नक्कीच मिळते. यशाला शॉर्टकट नसतो. तुम्हाला मेहनत करावीच लागते आणि जर ते क्षेत्र तुमच्या आवडीचे असेल तर तुम्हाला मेहनत करायची आवड निर्माण होते. तुम्ही तुमच्याशी स्पर्धा करा असेही मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. तर रवींद्र मालुसरे हे ''छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा दौलतीचे खांब'' या विषयावर बोलताना आपल्या भाषणात म्हणाले की, , स्व पासून सुरुवात करून शिवरायांनी स्वतःचे राज्य स्थापन केले आणि हे राज्य माझे नसून माझ्या रयतेचे आहे हा मंत्र त्यांनी जगाला दिला. त्यांचे कार्य पाहिले तर शिवाजी महाराज हे जगभरातल्या सर्व राजे, सम्राट, बादशहा यांच्यापेक्षा काकणभर सरस होते. त्यांच्या जीवनातील पराक्रमाचे आणि गनिमी काव्याचे प्रसंग अभ्यासून विद्यार्थ्यांनी त्यातून बोध घ्यावा. शिवपूर्वकाळाचा अभ्यास केल्यानंतर शिवाजी महाराजांचा जन्म कशासाठी झाला हे आपल्याला कळते. गडकिल्ले, बखरी, पोवाडे, शिवकालीन शस्त्रसंग्रह आणि विपुल ग्रंथसंपदा या सर्वातून छत्रपती शिवाजी महाराज अजूनही जिवंत आहेत आणि मराठी माणसांसाठी ही अभिमानाची बाब आहे.

माहिती प्रशासनिक अधिकारी देवेंद्र गोसावी आणि तेजस नलावडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचे जागतिक वारसा मानांकन हा खडतर टप्पा कसा पार केला? याची चित्रफितीद्वारे माहिती दिली. सहकार्याध्यक्ष प्रमोद वाघे आणि संयुक्त चिटणीस सोपान जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयक किरण कुबल, शंकर कामठे, शंकर उथळे पाटील, महिला मुख्य संघटक सौ स्वाती नाईक यांच्यासह समीतीच्या सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अथक मेहनत घेतली. याप्रसंगी समितीचे पदाधिकारी, कर्मचारी,विद्यार्थी-विद्यार्थिनी, शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते. समीतीच्या सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अथक मेहनत घेतली. याप्रसंगी समितीचे पदाधिकारी, कर्मचारी,विद्यार्थी-विद्यार्थिनी, शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते.

# देश - विदेशातील आकर्षक अमेझॉन पार्क करणार सिद्धेश्वर -रत्नेश्वर यात्रा महोत्सवाचा आनंद द्विगुणित

### गगनचुंबी रहाटपाळण्यांसह जलपरी शो जिंकणार लातूरकरांची मने

**लातूर/प्रतिनिधी :** लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर - रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवात देश - विदेशातील आकर्षक अमेझॉन पार्क यात्रा महोत्सवाचा आनंद द्विगुणित करणार असून गगनचुंबी रहाटपाळण्यांसह जलपरी शो सर्वच वयोगटातील नागरिकांची मने जिंकून घेणार असल्याचा विश्वास अमेझॉन पार्कच्या मुख्य आयोजकांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला.

विविध यात्रा महोत्सवात नागरिकांसाठी आकर्षक रहाट पाळणे आणि अन्य सुविधा उपलब्ध करुन देणारे ओरिसाचे अच्युत आनंद कुणी साहू, लातूरचे महेबूबभाई तांबोळी, मधू ठाकूर, नालासोपारा, मुंबईचे सुभाषभाई चौधरी यांनी यावर्षीच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवाच्या माध्यमातून लातूरकरांना उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या सुविधांची माहिती यात्रा महोत्सव परिसरात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावर्षीच्या यात्रा महोत्सवात आकर्षक झुला, आकाश पाळणा, व्हील जॉईंट, ब्रेक डान्स, टोरा टोरा, सलंबो, नावडी कोलंबस, ड्रॅगन ट्रेन, क्रॉस व्हील, रेंजर झुला, टावर, भूत बंगला,

फिलिपिनहून आलेला जलपरी शो सगळ्यासाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. त्याचबरोबर नवीन अॅटम चायना विंड व्हील,स्विंग स्विमिंग चेअर, सुनामी झुला, स्विमिंग टॉवर तसेच आकर्षक ऑक्टोपस शो लातूरकरांचे लक्ष वेधून घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.



त्याचप्रमाणे लहान मुलांसाठीही आकर्षक चिल्ड्रन पार्क उभारण्यात आले आहे.

यात्रेचा आनंद घेण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास, गैरसोय होणार नाही याची विशेष काळजी यात्रा महोत्सव समितीकडून घेतली जात आहे. रस्त्यावर धूळ उडू नये याकरिता मॅट अंथरण्यात आली आहे. तसेच धूळ उडू नये म्हणून दररोज पाणीही मारण्यात येत आहे. धूळ मुक्त यात्रा महोत्सव करण्याचा प्रयत्न असून यात्रा परिसरात कायदा सुव्यवस्था बिघडू नये व नागरिकांना संपूर्ण अमेझॉन पार्क चा आनंद घेता यावा यासाठी यात्रा संयोजक कमिटीच्या वतीने टॉवरची निर्मिती करण्यात आली आहे. संपूर्ण यात्रा परिसर सीसीटीव्हीच्या नियंत्रणाखाली खाली आहे.देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर, सुरेश गोजमगुंडे, ओमप्रकाश गोपे, व्यंकटेश हालिंगे, सिध्देश्वर उकरडे, महादेव खंडागळे, महादेव बन,अच्युतानंद कुणी साहू, ओरिसा,महेबूबभाई तांबोळी,,सुभाषभाई चौधरी, नालासोपारा मुंबई. मधु ठाकूर लातूर व महाशिवरात्री यात्रा संयोजन समिती, लातूर. लातूरकरांनी या आकर्षक सुविधाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## सहिष्णुतेची बीजे पेरणारा 'एक ओंकार'

कोणत्याही भूभागावर होणारे आक्रमण हे तेथील संस्कृतीवर, धार्मिक अटल निष्ठांवर असते. अशा आक्रमणांना शौर्याच्या गाथेत मोजता येणार नाही. संस्कृतीवर आक्रमण होते तिथे शौर्य नाही तर क्रौर्य म्हणूनच याकडे पाहिले पाहिजे. आपल्या भारताचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा उत्तरेतील विशेषत: सिंध प्रांत, पंजाब, काश्मिर यापाठोपाठ राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, गोवा, तामिळनाडू, पूर्वेतील राज्य व इतर भूभाग आपल्या डोळ्यासमोर येतात.

भारताच्या उत्तर सीमेपूरता विचार केल्यास आपल्याला अकराव्या-बाराव्या शतकात डोकावून पहावे लागेल. इसवी सन ७१२ मध्ये मुहम्मद बिन कासिम याने सिंध प्रदेशावर मोठे आक्रमण केले. हा एक अरब लष्करी सेनापती होता. त्यानंतर कासिमने सिंध आणि मूलतान काबीज केले. सिंधवरील अरब आक्रमणानंतर अकराव्या शतकात तुर्क लोकांनी भारतावर आक्रमण केले. यानंतर गजनीच्या महमुदने भारतावर आक्रमण केले. अनेक स्वाऱ्या करुन त्यानी नगरकोट, मथुरा, कनोज आणि ग्वालेरला लुटले. १०२५ मध्ये महमुदने काठीयावाडच्या सोमनाथ शिव मंदिरावर आक्रमण केले. पुढे महम्मद घोरी, तैमूर, कुतुबुद्दीन असे सूलतान झाले.

१२९६ च्या कालावधीत अलाऊद्दीन खिलजी याने दख्खन प्रांतात प्रवेश करुन यादवांची संपत्ती लूटली. मलिक कपूर याने १३१० मध्ये यादवांची सत्ता लयाला लावली. पुढे १३२४ ते १३५० याकाळात मुहम्मद तुघलक या दिल्लीच्या सूलतानाने आपली सत्ता दक्षिणेतल्या मदुराई पर्यत नेली. याची सत्ता क्षीण झाल्यावर अल्लाउद्दीन हसन बहमनी याच्या नेतृत्वाखाली १३४७ मध्ये बहमनी घराणे उदयास आले. आपल्या महाराष्ट्रातील देवगिरी अर्थात दौलताबाद हे त्याचे काही काळ राजधानीचे ठिकाण होते. त्या खालोखाल १६ शतकात गोवळकोंडयाची कुतूबशाही, विजापूरची आदिलशाही, बिदरची बरीदशाही आणि वराडची इमादशाही अशी पाच राज्यात विभाजीत झाली. भारतात बाबरपासून औरंगजेबच्या काळापर्यत झालेल्या अनेक अत्याचारांच्या आठवणी येथील प्रत्येक भूभागावर कोरलेल्या आहेत.

भारतावरील आक्रमाणांची ही मालिका डोळ्यापुढे ठेवली तर या आक्रमणांमध्ये उद्वस्त झालेल्या लोकांची मानसिकता ही आपल्या शौर्यातून प्रतिकारासह सहिष्णुतेकडेही अधिक झुकलेली दिसते. रोजच्या आक्रमणांना कंटाळून अहिंसेच्या तत्वावर जैन धर्माचा उदय झाला. याच सहिष्णुतेच्या मूल्यांना अधोरेखित करुन पंधराव्या शतकात गुरुनानकजी यांनी शिख धर्माची स्थापना केली.

मुघलांनी मोठ्या प्रमाणात धर्मावरील अतिक्रमण केले. यात शिखांच्या गुरुंवरील मुघल शासकांकडून केलेल्या अत्याचारांबाबत इतिहासातील पाने वाचतांना अंगावर शहारे येतात. परमेश्वर हा एक आहे आणि गुरुगंथसाहिब हा त्याचा पवित्र ग्रंथ आहे अशी श्रध्दा शिख धर्मियांमध्ये आहे. गुरु नानक हे शिखांचे पहिले गुरु. लाहोर जवळ तळवंडी अर्थात नानकानासाहिब या गावात त्यांचा जन्म झाला. भक्तीरसासाठी आवश्यक असलेल्या भजनांच्या म ाध्यमातून, शबद किर्तनाच्या माध्यमातून गुरुबाणी मधील गुरुंनी दिलेल्या शिकवणींचे नित्य स्मरण शिख धर्मिय करतात.

शिखांच्या गुरु नानकदेव, गुरु अगंददेव, गुरु अमरदास, गुरु रामदास, गुरु अर्जूनदेव, गुरु हरगोविंद, गुरु हरराए, गुरु हरकिशन, गुरु तेगबहादूर आणि दहावे गुरु गोविंदसिंग यांनी आपल्या शिख अनुयायांना अध्यात्मीकतेचा मार्ग दिला. लोकांच्या हिताकरीता देशासाठी आणि धर्मासाठी, धर्मातील मानवी मूल्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग करतात तसेच शिख मर्यादानुसार आपले जीवन व्यतीत करतात त्यांना खालसा म्हणतात. येथे सगूण देवदेवता तसेच सैतानाची शक्ती यांच्या अस्तित्वाला मान्यता नाही. सर्व चराचराची निर्मिती ही परमेश्वराची निर्मिती असून तो सर्व ठिकाणी आहे. तो स्वयंभू आहे अशी धारणा शिख धर्माची आहे. परम ेश्वराने सत्व, रज व तम हे तीन गुण निर्माण केले आहेत.

जीवन हे पापयुक्त नसून त्याचा उगम पवित्र आणि शुध्दतेत असल्यामुळे यात केवळ सत्याचा वास असल्याचे शिख धर्म मानतो. औरंगजेबाच्या काळात शिख धर्मगुरुंनी क्रुर अत्याचार सहन करुनही आपल्या सहनशक्तीला क्रौर्यातून प्रतिकार करण्याचे बांध फुटू दिले नाहीत.

भारतपर्वातील इतिहासाच्या या पाऊलखूणा सहिष्णुतेचे बळ घेऊन नव्या पिढीपर्यत पोहोचाव्यात यासाठी महाराष्ट्र शासनाने हिंद दी चादर श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दी समारोहानिमित्त संपूर्ण राज्यात विविध ठिकाणी जाहीर कार्यक्रम घेण्याचे निश्चित केले.

भारतीय संस्कृती संपवण्याचा मुघलांचा अट्टहास होता. या काळात गुरु तेगबहादूर साहिबजी व शिख समाज ढाल बनून पुढे आला या शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथील कार्यक्रमात गौरोद्गार काढले. मानवता, सत्य आणि धर्म रक्षा यासाठी गुरु तेगबहादूर साहिबजी यांचे योगदान मोलाचे आहे, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर येथे जाहीर कार्यक्रम ात सांगितले. ज्या देशाने सर्व विचार प्रवाहांचा, विविधतेचा, धर्म, जात, पंथाचा सन्मान केला त्या भारतावर मुघलानी आक्रमण करुनही, प्रचंड अत्याचार करुनही यातील सौहार्दता कोणीही नष्ट करु शकले नाही, असे संत ज्ञानी हरनामसिंग यांनी नमूद केले आहे. एवढ्या साऱ्या आक्रमणांच्या आव्हानाला सहिष्णुतेने परतवून लावणारा हा एक ओंकार म्हणून शिख धम र्च्या शिकवणुकीकडे आपण पाहिले पाहिजे.

**– विनोद रापतवार**

०००००००००००००००००००

## बीट खाताना 'ही' चूक पडू शकते महागात! कच्चं बीट खाण्यापूर्वी जाणून घ्या 'हे' वास्तव

कोणताही आरोग्यदायी पदार्थ खाण्याची पद्धत चुकली तर ती शरीरासाठी घातक ठरू शकते. विशेषतः बीट खाताना ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे, अन्यथा फायद्याऐवजी नुकसान होण्याची शक्यता अधिक असते.

शरीरातील रक्ताचे प्रमाण वाढवणे, रोगप्रतिकारशक्ती सुधारणे आणि वजन नियंत्रित ठेवण्यासाठी बीट खाण्याचा सल्ला दिला जातो. यामध्ये व्हिटॅमिन सी, ए, अँटिऑक्सिडंटस् आणि खनिजांचा मोठ्या प्रमाणावर समावेश असल्याने याला सुपरफूड म्हटले जाते. मात्र, कोणताही आरोग्यदायी पदार्थ खाण्याची पद्धत चुकली तर ती शरीरासाठी घातक ठरू शकते. अनेकजण बीट कच्चे खातात किंवा त्याचा रस पितात. परंतु, ही पद्धत चुकीची ठरू शकते. बीट ही मुळाची भाजी असल्याने त्यात जमिनीतील मातीतून येणारे बॅक्टेरिया, पेस्टिसाईडस् आणि हेवी मेटल्स असण्याची शक्यता असते. यामुळे पोटाचे विकार जडण्याची किंवा शरीरातील महत्त्वाच्या अवयवांना इजा पोहोचण्याची भीती असते. म्हणूनच, बीट नेहमी हलके शिजवून किंवा वाफवून खाणे अधिक सुरक्षित मानले जाते.

ज्यांना किडनी स्टोन म्हणजेच मूतखड्याचा त्रास आहे, त्यांनी बीट खाणे टाळावे. बीटमध्ये ऑक्सलेटस्चे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे किडनीमध्ये कॅल्शियम ऑक्सलेटस् स्टोन तयार होण्याचा धोका वाढतो. तुम्हाला मूत्रपिंडाशी संबंधित इतर काही समस्या असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय बीटचे सेवन करू नका. ज्या व्यक्तींना 'आयबीएस' (इरिटेबल बॉवेल सिंड्रोम) किंवा 'आयबीडी' (इन्फ्लेमेटरी बॉवेल डिसीज) यांसारख्या आतड्यांच्या समस्या आहेत, त्यांनी कच्च्या बीटचे सेवन पूर्णपणे टाळावे. कच्चे बीट खाल्ल्याने पोटदुखी, गॅस, पोट फुगणे आणि पोटातील अस्वस्थता वाढू शकते. यामुळे आधीच असलेला आजार अधिक बळावण्याची शक्यता असते.

# स्वार्थी जगात माईंचे माहेर मेले...

**थकलेली माणसं , विजय तरवडे**



पुण्यात मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या माई अकरावी (त्या वेळची मॅट्रिक) पास झाल्या आणि लगेच त्यांना जातीतले स्थळ सांगून आले. मुलगा दिसायला छान आणि सुस्वभावी होता. लठ्ठ पगाराची नोकरी होती. फक्त एकच–नोकरी कोलकात्यात होती. इतके लांब; पण स्थळात इतर त्रुटी काढायला एवढी देखील जागा नव्हती. मग, ते लग्न यथासांग पार पडले. माई सासरी गेल्या. लवकरच 'गुड न्यूज' आली; पण नवर्याने त्यांना प्रसूतीसाठी पुण्याला पाठवले नाही. माईंच्या मुलाचा जन्म कोलकात्यातच झाला. बारशासाठी मात्र माईंचे आईवडील, चंदन आणि शालन ही भावंडे अशा चौघांसाठी माईंनी रेल्वे तिकिटांचे पैसे पाठवले, माईंचे माहेर कोलकात्याला गेले. बारसे पार पडल्यावर महिनाभर कलकत्त्यात राहून चौघे पुण्याला परतले.

मग, दरवर्षी हा प्रघात ठरून गेला. उन्हाळ्यात शाळांना सुट्ट्या लागल्या की, सातवीतला चंदन आणि आठवीतली शालन आपल्या आईसह (माईंच्या खर्चाने) कोलकात्याला जात. महिनाभर मज्जा करून पुण्याला येत. माईंच्या लहानग्या मुलाला चंदन मामा आणि शालनमावशीचा लळा लागला. उन्हाळ्याची चाहूल लागली की, तो आजीची, मामाची आणि मावशीची वाट बघू लागला.

चार वर्षे गेली. चंदन आणि शालनने देखील अकरावीचा उंबरा ओलांडला. यथावकाश दोघांना नोकर्या लागल्या. आता ते महिनाभर कलकत्त्याला जाणे कमी झाले. माईंचा बाळा देखील मोठा झाला. माई आपल्या बाळासह आणि पतीसह पुण्याला येऊ लागल्या; पण भावंडांच्या संसाराला हातभार लावत राहिल्या. चंदनचं लग्न झाले. माईंनी सर्वांत महागडा आहेर केला. शालनच्या लग्नात भक्कम आर्थिक मदत केली. माईंचं आणि माहेरचं नातं असं रेशमी आणि निर–पेक्ष होते. दिवस जात होते. वर्षे लोटत होती. भिंतीवरची कॅलेंडरे बदलत होती. त्या ओघात माईंचे आई–बाबा थोड्या थोड्या अंतराने दगावले. शालनच्या नवर्याची दूर परगावी बदली झाली. ती सासरी गेली आणि तिथेच गुरफटली. माईंच्या माहेरात आता फक्त चंदन, वहिनी आणि भाचे–भाच्या उरल्या. माईंचा नवरा निवृत्त झाला. महाराष्ट्रात परत यायचे म्हणून कलकत्ता सोडून सगळे निघाले. माईंच्या मुलाला मुंबईत नोकरी लागली. मग ते मुंबईत आले. स्थायिक झाले. माईंनी सत्तरी ओलांडली आणि त्यांचा नवरा काही आजाराचे निमित्त होऊन दगावला.

चंदन–वहिनीच्या मुली लग्न होऊन सासरी गेल्या होत्या, घरात दोघेच होते.सटीसामाशी माईंना घरात करमेनासे होई. माहेरची आठवण येई. अशावेळी त्यांचा पन्नाशीतला मुलगा त्यांना कॅबमध्ये बसवून पुण्याला पाठवी. अशावेळी माईंसोबत त्यांची मेड सर्व्हंट असायची. वयोपरत्वे माईंना आता कमी दिसायला लागलेले, खाण्यावर निर्बंध नसल्याने तब्येतीची 'उलट हेळसांड' होऊन वजन खूप वाढले होते. रक्तदाब, मधुमेह नावाचे राहू–केतू शरीराच्या कुंडलीत कायमचे वस्तीला आले होते. मेड सर्व्हंट माईंची सगळी काळजी घेई. त्यांना वेळेवर गोळ्या देई.

यावेळी अघटित घडले. माई माहेरी आल्या. एकच दिवस राहिल्या. संध्याकाळी त्या चंदन आणि वहिनींसह अंगणात गप्पा मारत बसल्या होत्या. अंधारून आले तशी सगळे घरात जायला उठले. उठताना खुर्ची मागे सरकवण्याच्या नादात माई सटकन घसरल्या आणि पाठीवर पडल्या. कळवळल्या. त्यांना उठता येईना. चंदन आणि वहिनीने त्यांना बसते केले; पण वेदना असह्य होत्साता माई पुन्हा कोसळल्या. आक्रोश करू लागल्या. चलाख आणि तत्पर मेड सर्व्हंटने चटकन मोबाईल काढला आणि रुग्णवाहिका बोलावली.

माईंना कोणत्या रुग्णालयात न्यायचे यावर मेड सर्व्हंट आणि चंदन चर्चा करीत होते. वहिनी दादाच्या कानाला लागली आणि कुजबुजली, त्यांच्या मणक्याला मार लागलेला दिसतोय. उगीच आपल्या गळ्यात लचांड घेऊ नका. अँब्युलन्स थेट मुंबईला पाठवा. चंदनने होकार दिला. मेड सर्व्हंटने आणि जमिनीवर लोळत आक्रोश करणार्या माईंनी ते ऐकले. मेड सर्व्हंटने त्यानुसार अँब्युलन्स मागवली. सेवकांनी माईंना उचलून स्ट्रेचरवर घेतले आणि अँब्युलन्समध्ये नेले. तिथल्या परिचारिकेने त्यांना तातडीने एक इंजेक्शन दिले. अँब्युलन्सचे दार बंद करताना चंदन वहिनीकडे बघून म्हणाला, सुटलो एकदाचे. माई मनात म्हणाल्या, चंदू आता तू मला मेलास, मी तुला मेले, माझे माहेर देखील मेले रे... माईंना धाय मोकलून रडायचे होत; पण त्याआधीच त्या कोमात गेल्या.


(व्यक्तींची, स्थळांची नावे परिवर्तित.)

# किडनीच्या रुग्णांनी....

## (कालच्या अंकावरुन)

**काकडी**





काकडी जे बहुतेकदा सॅलडमध्ये खाल्ले जातात, ते आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. तथापि, जास्त प्रमाणात सेवन करणे हानिकारक असू शकते. काकडीच्या बियांमध्ये ऑक्सलेटचे प्रमाण जास्त असते, जे एक सेंद्रिय संयुग आहे जे किडनी स्टोनचा धोका वाढवू शकते.

**बटाटे**–काही सामान्य भाज्यांमध्ये ऑक्सलेटचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे किडनी स्टोन होऊ शकतो. यामध्ये बटाटे आहे. किडनी स्टोनच्या रुग्णांनी बटाट्याचे सेवन कमी करावे.

**सोयाबीन**–काही सामान्य भाज्यांमध्ये ऑक्सलेटचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे किडनी स्टोन होऊ शकतो. यामध्ये सोयाबीनचा समावेश आहे.

जर तुम्ही त्यांचे दररोज सेवन केले तर ते तुमच्या मूत्रपिंडांसाठी थोडे हानिकारक ठरू शकतात. शिवाय, ज्या लोकांना आधीच किडनी स्टोनचा त्रास आहे त्यांनी या गोष्टींचे सेवन करणे टाळावे.

**अस्वीकरण :** या ले–खात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत लातूर समाचार कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

## कल्पवृक्ष–उपदेशकथा

एकदा एक माणूस अरण्यात भटकत होता. अतिशय थकल्याने तो एका घनदाट वृक्षाखाली बसला. योगायोगाने तो कल्पवृक्ष होता. तहानेने व्याकुळ झाल्याने त्याच्या मनात आले, या अरण्यात पाणी मिळेल काय? असा विचार करीत असतानाच त्याच्या पुढ्यात जलकुंभ येऊन थांबला. आश्चर्यचकित होऊन पाणी पिऊन त्याने तहान शमविली. काही वेळाने भूक लागल्याने त्याने उत्तम भोजनाची इच्छा केली असता विविध पदार्थांनी व पक्वान्नांनी भरलेले भोजनाचे ताट त्याच्या पुढ्यात आले. भोजन करून तो तृप्त झाला. भोजनानंतर वामकुक्षी घ्यावी असा विचार करताच एक सुंदर शय्या तेथे स्थापित झाली व तो त्यावर सुखनैव विश्रांती घेऊ लागला. झोपून उठल्यावर त्याने पाहिले की, सूर्यकिरणे संधीकाळात पसरली होती. त्याने विचार केला, आता तर संध्याकाळ झाली. या वनात राहाणे आता युक्त नाही, एखादा हिंस्र प्राणी किंवा सिंह येऊन मला खाऊन तर टाकणार नाही ना? असा त्याने विचार करताच एका सिंहाने येऊन त्याच्यावर झडप घालून त्यास खाऊन टाकले.

कथा उपदेश : आपले मनच कल्पवृक्षाप्रमाणे असते. जशी इच्छा तशी फळे!

## एपस्टीन फाइल्स प्रकरण

# कोवळ्या जीवांचा दबलेला आवाज पत्रकार ज्युली यांच्यामुळेच आला जगासमोर



पत्रकार ज्युली के. ब्राउन यांनी जेफ्री एपस्टीन प्रकरणाचा जो छडा लावला, ती केवळ एक बातमीदारी नव्हती, तर ते सत्तेच्या शिखरावर बसलेल्या नराधमांविरुद्ध दाखवलेले अजोड धाडस होते. जेफ्री एपस्टीन हा साधा गुन्हेगार नव्हता. त्याच्याविरुद्ध पुरावे गोळा करणे म्हणजे स्वत:चे करिअर आणि आयुष्य धोक्यात घालण्यासारखे होते. तरीही ज्युली मागे हटल्या नाहीत. त्यांच्या बातमीदारीमुळे केवळ एपस्टीनला अटकच झाली नाही, तर व्यवस्थेतील अनेक दोषही समोर आले.

**एकाकी लढा**

२००८ मध्ये जेफ्री एपस्टीनला या प्रकरणात सौम्य शिक्षा देऊन प्रकरण मिटवण्यात आले होते. मात्र, ज्युली यांनी १० वर्षांनंतर हे प्रकरण पुन्हा उकरून काढण्याचे ठरवले. त्यांनी हजारो पानांचे जुने न्यायालयीन रेकॉर्डस् तपासले. न्यूयॉर्क टाइम्स आणि वॉशिंग्टन पोस्टसारख्या मोठ्या वृत्तपत्रांनीही या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले होते; परंतु ज्युली यांनी 'मियामी हेराल्ड' या छोट्या वृत्तपत्रात असूनही हा विषय हाती घेण्याचे धाडस दाखवले. त्यांना सुरुव–ातीला कोणीही मदत करायला तयार नव्हते, तरीही त्या मागे हटल्या नाहीत.

**सत्तेला दिलेले आव्हान**

एपस्टीनचे संबंध अमेरिकेचे माजी अध्यक्ष बिल क्लिंटन, डोनाल्ड ट्रम्प आणि ब्रिटनचे राजकुमार अँड्रयू यांच्याशी होते. अशा शक्तिशाली व्यक्तींशी संबंधित असलेल्या माणसाच्या विरोधात पुरावे गोळा करणे म्हणजे स्वतःच्या करिअरशी आणि जीविताशी खेळण्यासारखे होते. ज्युली यांनी हे धोके ओळ–खूनही तपास सुरू ठेवला.

**सरकारी यंत्रणेवरही प्रहार**–ज्युली यांनी केवळ एपस्टीनला लक्ष्य केले नाही, तर त्याला वाचवणार्या सरकारी यंत्रणेवरही प्रहार केला. त्यांनी तत्कालीन वकील आणि नंतरचे कामगार मंत्री अलेक्झांडर अकोस्टा यांनी एपस्टीन वाचविण्यासाठी तयार केलेला गुप्त करार उघड केला. त्यामुळे अकोस्टा यांना राजीनामा द्यावा लागला, हे त्यांच्या पत्रकारितेतील मोठे धाडस आहे.

**पीडितांना पुन्हा बोलते करण्याचे कसब**

लैंगिक शोषणातून वाचलेल्या महिलांना पुन्हा त्या काळ्या आठवणींबद्दल बोलायला लावणे हे अत्यंत संवेदनशील काम होते. ज्युली यांनी शेकडो महिलांशी संपर्क साधला आणि त्यांना विश्वासात घेऊन बोलते केले. त्यांनी पीडितांना खात्री दिली की, यावेळी विजय त्यांचाच होईल.

**तांत्रिक आणि कायदेशीर अडथळ्यांवर मात**

एपस्टीनकडे जगातील सर्वांत महागडे वकील होते. ज्युली आणि मियामी हेराल्डवर खटले भरण्याच्या धमक्या वारंवार येत होत्या. आपल्याकडून कोणतीही चूक होऊ नये, म्हणून ज्युली यांनी हजारो पानांचे क्लिष्ट कायदेशीर दस्तावेज स्वतः वाचले. एका लहान वृत्तपत्रासाठी इतक्या मोठ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर लढा देणे आर्थिकदृष्ट्या जोखमीचे होते, तरीही त्यांनी व्यवस्थापनाला यासाठी तयार केले.

**ज्युली यांचे धाडस** –ज्युली यांच्या बातम्यांमुळेच २०१९ मध्ये न्यूयॉर्क पोलिसांनी एपस्टीनला पुन्हा अटक केली. अनेक वर्षांनंतर पीडित महिलांना न्यायालयात आपली बाजू मांडण्याची संधी मिळाली. आज ज्या 'एपस्टीन फाइल्स' जगभरात गाजत आहेत, त्या सार्वजनिक होण्यामागचे मूळ कारण ज्युली यांची चिकाटीच आहे. जर ज्युली यांनी ते धाडस दाखवले नसते, तर जेफ्री एपस्टीन आजही मोकाट असता आणि जगातील अनेक शक्तिशाली व्यक्तींचे काळे कारनामे कधीच उघड झाले नसते.

## १ Doctor Tips – सल्ला डॉक्टरचा

**काय करावं तेच समजत नाही**



२९ वर्षाचा तरुण मला ही गोष्टी फार उद्विग्नपणे सांगत होता. तो फार हताश झालेला होता. लग्नानंतर लगेचच त्याचे शारीरिक संबंध स्थापित झाले. परंतु त्यात त्याचं वीर्यस्खलन लवकर होत होतं. त्यामुळे पत्नीचं समाधान होत नव्हतं. या सर्व प्रकारामुळे त्याला मानसिक दडपण आलं होतं. त्याची भीती अजूनच वाढू लागली. त्यातच तो अविवाहित असताना कधी–कधी हस्तमैथुन करत असे. **(क्रमशः)**

## २ Joke – विनोद





ङ्गतुम्हाला माहीत आहे का की भाकरी ही विमानाची आई आहे?फ

ङ्गकसं शक्य आहे?फ

ङ्गअसं पहा, विमान हा एक शोध आहे. भाकरी ही गरज आहे. बरोबर? आता ज्या अर्थी गरज ही शोधाची जननी आहे, त्याअर्थी भाकरी ही विमानाची आई आहे.

## ३ Message – संदेश




Sony Ka Anda

Ek Aadmi Raat Ko Sharab Pi Ker Ghar Wapas Aya Aur Soty Hi Bhagwan Ko Piyara Ho Gaya. Uper Ja Ker Us Ny Bhagwan Se Ek Aur Jeewan Manga. Bhagwan Ny Is Dafa Usay Murgi Ban Ker Wapas Bhej Diya.Murgi Ban Ker Us Ny Ek Anda Diya, Andy Ko Dekh Ker Us K Hosh Urr Gaye QK Anda Sony Ka Tha..Khushi Me Us Ny Ek Aur Anda Diya, Aur Jese Hi Wo Teesra Anda Dene Laga To Us K Sir Per Kisi Ny Joota Mara.. Aur Jab Us Ny Aankhen Khol Ker Dekha To Uski Bivi Chilla rahi Thi: "Uth Ja Kaminay, Sharab Pi Ker Bister Per Tatti Kiye Ja Raha Hai..

## ४ Thought – सुविचार




अंधश्रद्धेने मूर्ख बनण्यापेक्षा नास्तिक परवडला.

**– स्वामी विवेकानंद**

**संस्कृत सुभाषित**

अनाहूत: प्रविशती अपृष्टो बहु भाषते
अविश्वस्ते विश्वसिति मूढचेता
नराधम:।।
(उद्योगपर्व, अध्याय ३३, श्लोक ४१, महाभारत)
सोडून जातात.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहर्‍यावरील तेज
२३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

### उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत,२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत,४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

### आडवे उत्तरे

१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अव–हेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

### उभे उत्तरे

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ




# ऑस्ट्रेलियाचा दणदणीत विजय, ओमानने दिलेले आव्हान ९.४ षटकात केलं पूर्ण

**ऑस्ट्रेलिया आणि ओमान या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने एकतर्फी विजयाची नोंद केली आहे**

**नवी दिल्ली:** आयसीसी टी -२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत वर्ल्ड चॅम्पियन ऑस्ट्रेलियाला हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. संघातील मुख्य खेळाडू दुखापतीमुळे बाहेर झाले. तर आहे त्या खेळाडूंना अपेक्षित काम गिरी करता आलेली नाही. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला साखळी फेरीतून बाहेर पडावं लागलं आहे. पण जाता जाता ऑस्ट्रेलियाने ओमानवर एकतर्फी विजयाची नोंद केली आहे. या साम न्यातील पहिल्या डावात ओमानचा डाव अवघ्या १०४ धावांवर आटोपला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी ऑस्ट्रेलियाने दिलेलं आव्हान अवघ्या ९.४ षटकात पूर्ण केलं आणि ९ गडी राखून विजय मिळवला.

या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या ओमानचा डाव अवघ्या १६.२ षटकात अवघ्या १०४ धावांवर आटोपला. ओमानकडून फलंदाजी करताना सलामीला आ- लेला कलीम शून्यावर माघारी परतला. कर्णधार जतिंदर सिंगने १७ धावा केल्या. तर हमद मिर्झाने १६ धावा केल्या. तर वसीम अलीने ३२ धावा केल्या. ओमानकडून एकही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. ऑस्ट्रेलियाकडून गोलंदाजी करताना ॲडम झाम्पाने सर्वाधिक ४ गडी बाद केले.ऑस्ट्रेलियाला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १०५ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या ऑस्ट्रेलियाकडून मिचेल मार्शने ३३ चेंडूत नाबाद ६४ धावा केल्या. यादरम्यान त्याने ७ चौकार आणि ४ षटकार मारले. तर ट्रॅव्हिस हेडने १९ चेंडूत ६ चौकारांच्या साहाय्याने ३२ धावांची खेळी केली. तर जोस इंग्लिसने नाबाद १२ धावा केल्या. यासह ऑस्ट्रेलियाने दिलेलं आव्हान अवघ्या ९.४ षटकात पूर्ण केलं आणि ९ गडी राखून विजय मिळवला.

ऑस्ट्रेलिया साखळी फेरीतून बाहेर या स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलियाचा ग्रुप बी मध्ये समावेश करण्यात आला होता. ऑस्ट्रेलियाला या स्पर्धेतील ४ पैकी २ सामन्यात विजय मिळवता आला. तर २ सामन्यामध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. मुख्य बाब म्हणजे आयटीएल



## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारतीय संघाला हरवणे कठीण; रविचंद्रन अश्विन

मुंबई-भारतीय संघाने टी-२० वर्ल्ड कपच्या गट टप्प्यात अपराजित राहून सुपर-८ मध्ये प्रवेश केला आहे. भारतीय संघ सध्या उत्कृष्ट लयीत असून त्याला विजेतेपदाचा प्रबळ दावेदार मानले जात आहे. यादरम्यान भारतीय संघाचा माजी ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विन याने सांगितले की, भारतीय संघ सर्वोत्तम फॉर्ममध्ये नसला तरी त्याची एकूण ताकद इतकी भक्कम आहे की साधारण दिवस- ातही त्याला पराभूत करणे कोणत्याही संघासाठी सोपे नाही.रविचंद्रन अश्विन याने एका यूट्यूब शोमध्ये सूर्या ब्रिगेडच्या सातत्यपूर्ण कामगिरीचे कौतुक केले. मात्र नेदरलँड्सविरुद्धचा फलंदाजीतील खेळ अपेक्षेइतका प्रभावी नसल्याचेही मान्य केले. अश्विन म्हणाला की सूर्यकुमार यादवने संयमाने डाव पुढे नेला, तर शिवम दुबे , हार्दिक पांड्या आणि रिंकू सिंग यांनी योग्य वेळी रन्स वाढवले तर भारतीय संघ सर्वोत्तम फॉर्ममध्ये नसला तरी त्याची एकूण ताकद इतकी भक्कम आहे की साधारण दिवसातही त्याला पराभूत करणे कोणत्याही संघासाठी सोपे नाही, असे अश्विनने नमूद केले.


### वैभव सारखे खेळ, पण टायमिंगवर...; सुपर-८ आधी अश्विनचा फलंदाजाला थेट मेसेज

मुंबई -टीम इंडियाने आपल्या टी-२० विश्वचषक २०२६ मोहिमेत गट टप्पातील सर्व सामने जिंकले असून आता सुपर-८ मध्ये त्याची खरी कसोटी लागणार आहे. गतविजेता टीम इंडिया पुढील फेरीत बलाढ्य संघांविरुद्ध मैदानात उतरणार आहे. २०२४ चा उपविजेता दक्षिण आफ्रिका, तसेच वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे हे प्रतिस्पर्धी भारतासमोर असणार आहेत. आतापर्यंत भारत या स्पर्धे त अजिंक्य आहे, मात्र या प्रवासात काही उणिवाही स्पष्टपणे दिसून आल्या आहेत. सुपर-८पूर्वी त्या दुरुस्त केल्या नाहीत, तर उपांत्य फेरीचा मार्ग कठीण ठरू शकतो.मभारताला हरवणं कठीण...फ- आर. अश्विन भारताचा माजी फिरकीपटू आर. अश्विन याने भारतीय संघाच्या सातत्यपूर्ण कामगिरीचं कौतुक केलं. नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यातही कामगिरीत कुठलीही कमतरता नव्हती, असं त्याने नमूद केलं. सूर्यकुमार याद- वने संयमाने डाव सावरला, तर शिवम दुबे, हार्दिक पांड्या आणि रिंकू सिंग यांनी योग्य वेळी धावगती वाढवण्याची जबाबदारी पार पाडली.

### शनाकाने असा पकडला टी २० वर्ल्ड कप २०२६ मधील बेस्ट कॅच

कोलंबो -श्रीलंका विरुद्ध झिम्बाब्वे यांच्यात गुरुव- ारी वर्ल्ड कप २०२६ चा ग्रुप स्टेज सामना पार पडला. या अतिशय रोमांचक सामन्यात झिम्बाब्वेने श्रीलंकेचा ६ विकेटने पराभव करून वर्ल्ड कपमध्ये उलटफेर केला. या सामन्यापूर्वी झिम्बाब्वेचा संघ सुपर ८ मध्ये क्वालिफाय झाला होताच मात्र श्रीलंकेला हरवून त्याने ग्रुप बीमध्ये प्रथम स्थान सुद्धा मिळवलं. मात्र या सामन्यात श्रीलंकेचा कर्णधार दासुन शनाका याने झिम्बाब्वेच्या शेवटच्या काही ओव्हर सुरु असताना एक जबरदस्त कॅच पकडला. या कॅचचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतोय. २५ मीटर उलटा पळाला दासुन शनाका : श्रीलंकेचा कर्णधार दासुन शनाकाचा कॅच पाहून तुमच्या अंगावर रोम ांच उभा राहिल्या शिवाय राहणार नाही. सध्या या कॅचचा व्हिडीओ व्हायरल होत असून झिम्बाब्वेला शेवटच १२ बॉलमध्ये १३ धावांची आवश्यकता होती.

# ४ संघ सेमी फायनलमध्ये जाणार; माजी खेळाडू



**नवी दिल्ली:** आयसीसी टी -२० वर्ल्डकप स्पर्धेत कोणते ४ संघ सेमी फायनलमध्ये प्रवेश करणार? याबाबत माजी खेळाडू संजय बांगर यांनी मोठी भविष्यवाणी केली आहे.

आयसीसी टी -२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धा सध्या शेवटच्या टप्प्यात आहे. साखळी फेरीतील सामने पूर्ण झाले असून आता सुपर ८ फेरीतील सामन्यांना सुरुवात होणार आहे. २० पैकी ८ संघ सुपर ८ फेरीत दाखल झाले आहेत. तर या ८ पैकी ४ संघ स्पर्धेतील सेमीफायनलमध्ये प्रवेश करणार आहेत. दरम्यान भारताचे माजी क्रिकेटपटू संजय बांगर यांनी कोणते ४ संघ सेमी फायनलमध्ये जाणार, याबाबत भविष्यवाणी केली आहे.

कोणते ४ संघ सेमी फायनल गाठणार? सुपर ८ फेरीतील सामन्यांना सुरुव- ात होणार आहे. हे सामने सुरू होण्याआधी क्रिकेटच्या दिग्गजांनी सेमी फायनलमध्ये जाणाऱ्या संघांची निवड करायला सुरूवात केली आहे. चेतेश्वर पुजारा, मोहम्मद कैफ, वरुण आरोन, संजय बांगर यांनी सेमी फायनलमध्ये जाणाऱ्या संघांची निवड केली आहे.

संजय बांगर यांनी सेमी फायनलमध्ये जाणारे ४ संघ निवडले आहेत.

आज अफगाणिस्तान क्रिकेट जे आहे, ते फक्तःङ्क, राशिद खानने कोणाचे मानले आभार?

दुष्काळात तेरावा महिना!

पाकिस्तानच्या ४ खेळाडूंवर ‘ही’ मोठी स्पर्धा खेळण्यावर बंदी

संजय बांगर यांच्या मते भारत, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान आणि श्रीलंका हे ४ संघ सेमी फायनलमध्ये प्रवेश करू शकतात. ग्रुप ए मधून भारत आणि दक्षिण आफ्रिका आणि दुसऱ्या ग्रुप मधून पाकिस्तान आणि श्रीलंका हे दोन्ही संघ सेमी फायनलमध्ये प्रवेश करू शकतो.भारताचा फिरकीपटू युजवेंद्र चहलने देखील स्टार स्पोर्ट्सवर बोलताना ४ संघ निवडले आहेत जे या स्पर्धेतील सेमी फायनलमध्ये प्रवेश करू शकतात. चहलच्या मते, भारत, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि न्यूझीलंडचा संघ सेमी फायनलमध्ये प्रवेश करू शकतो. आता कोणते ४ संघ सेमी फायनलमध्ये प्रवेश करणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

गेल्या टी -२० वर्ल्डकप स्पर्धेत भारत आणि दक्षिण आफ्रिका हे दोन्ही संघ फायनलमध्ये आमनेसामने आले होते. या सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करून जेतेपद- ाचा मान मिळवला होता. यावेळी पुन्हा एकदा भारत - दक्षिण आफ्रिका फायनल सामना पाहायला मिळू शकतो.

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत ४२ शहरातील मल्ल सहभागी होणार

पुणे : महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा पुणे जिल्ह्यातील वाघोलीत होणार आहे. १८ ते २२ मार्च दरम्यान वाघोलीत ही कुस्ती स्पर्धा पार पडणार आहे. कुस्तीगीर परिषदेच्या पुण्यात झालेल्या बैठकीत वाघोलीच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. यावेळी कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष रामदास तडस आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.या ज्याच्या क्रीडा विश्वात मानाच्या समजल्या जाणार्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच यजमानपद यावर्षी पुण्याला मिळालं आहे. पुण्यातील वाघोलीत या स्पर्धा होणार आहेत. वाघोलीत १८ ते २२ मार्च दरम्यान विविध वजनी गटात या स्पर्धा पार पडणार आहेत. याचबरोबर ६८ वी वरिष्ठ गट माती आणि गादी प्रकारातील राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा देखील होणार आहे. या कुस्ती स्पर्धेत ४२ शहरातील जवळफास ८४० कुस्तीगीर सहभागी होणार आहेत. दरवर्षीप्रमाणे विजेत्याला मल्ल मामासाहेब मोहोळ यांच्या स्मरणार्थ १ किलो चांदीची गदा देण्यात येणार आहे. तर इतर गटातील कुस्तीगिरांना रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. आज पुण्यात कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष रामदास तडस यांच्या उपस्थितीत कुस्तीगीर परिषदेची बैठक झाली. यावेळी हा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र केसरी ही महाराष्ट्रातील माती व मॅट विभागातील सर्वोच्च मानाची कुस्ती स्पर्धा आहे. ज्याची सुरुवात १९६१ मध्ये कुस्तीमहर्षी मामासाहेब मोहोळ यांच्या पुढाकाराने झाली होती. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेमार्फत आयोजित या स्पर्धे




त विजेत्याला मानाची 'गदा' व रोख रक्कम देऊन गौरवण्यात येते. पहिली महाराष्ट्र केसरी स्पर्धा ही १९६१ मध्ये छत्रपती संभाजीनगर मध्ये झाली होती. या स्पर्धेचे पहिले मानकरी दिनकर दह्यारी होते. ही स्पर्धा माती आणि मॅट अशा दोन्ही प्रकारांत खेळवली जाते. विविध वजनी गटातील मल्ल अंतिम लढतीसाठी पात्र ठरतात. या स्पर्धेमुळे राज्यातील ग्रामीण भागातील मल्लांना व्यासपीठ मिळते आणि ही महाराष्ट्राच्या परंपरेचा भाग आहे. विजेता मल्ल 'महाराष्ट्र केसरी' किताबाचा मानकरी ठरतो आणि त्याला मानाची गदा मिळते.महाराष्ट्र केसरी स्पर्धा ही एक केवळ कुस्ती नसून तो एक मोठा सांस्कृतिक व क्रीडा उत्सव मानला जातो. या महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या कामाकोपर्यातून कुस्तीप्रेमी कुस्तीचा थरार पाहण्यासाठी येतात.

# श्रीलंकेवर भारताचा एकहाती विजय; भारतीय संघाची फायनलमध्ये धडक

बँकॉक-थायलंडमधील बँकॉक इथे सुरु असलेल्या महिला आशिया कप रायझिंग स्टार्स २०२६ मध्ये भारतीय महिला क्रिकेट संघाने आपली दमदार कामगिरी सुरु ठेवली आहे. भारतीय संघ आता अंतिम फेरीत पोहोचला आहे. टीम इंडियाचा सामना सेमीफायनलमध्ये श्रीलंकेच्या महिला संघाशी झाला होता, जिथं त्यांनी सामना सहज जिंकला. टीम इंडियाच्या विजयात त्यांच्या गोलंदाजांनी महत्त्वाची भूमिका बजावली. गोलंदाजीसोबतच टीम इंडियाने फलंदाजीतील कौशल्य दाखवत श्रीलंकेचा ५ विकेट्सने पराभव केला.

कसा झाला सामना : भारत महिला अ आणि श्रीलंका महिला अ यांच्यात झालेल्या या साम न्यात श्रीलंकेच्या संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, नाणेफ क गमावल्यानं भारतीय संघावर कोणताही परिणाम झाला नाही. प्रथम फलंदाजी करणाऱ्या टीम इंडियानं श्रीलंकेला १९.४ षटकांत ११८ धावांवर गुंडाळलं. भारतीय गोलंदाजांनी श्रीलंकेच्या कर्णधाराचा प्रथम फलंदाजीचा निर्णय पूर्णपणे चुकीचा सिद्ध केला. या सामन्यात टीम इंडियानं पहिल्या डावातच आपलं वर्चस्व प्रस्थापित केलं.

राधा यादवची गोलंदाजीत सर्वोत्तम कामगिरी : टीम इंडियाची कर्णधार राधा यादवनं गोलंदाजीत सर्वोत्तम कामगिरी केली. तिनं ३.४ षटकांत फक्त १९ धावा दिल्या आणि ४ बळी घेतले. राधा यादव ही भारतीय वरिष्ठ महिला संघाचा भाग आहे.

तनुजा कंवर आणि प्रेरणा रावत यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर मिनू मणी आणि साईमा ठाकोर यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. भारतीय गोलंदाजांनी श्रीलंकेच्या कोणत्याही फलंदाजाला स्थिरावू दिलं नाही. संचना कविंदीनं त्यांच्याकडून सर्वाधिक ३१ धावा केल्या.



**श्रीलंकेचा ५ विकेट्सने दारुन पराभव**

भारतीय संघाचा एकहाती विजय : ११९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, भारतीय महिला संघानं दमदार सुरुवात केली, परंतु टीम इंडियानं त्यांचा पहिला बळी अवघ्या ३० धावांवर गमावला. त्यानंतर, वृंदा दिनेश आणि अनुष्का शर्मा यांनी २४ चेंडूत ४७ धावांची भागीदारी केली. श्रीलंकेच्या गोलंदाजांनी ही भागीदारी मोडली तोपर्यंत खूप उशीर झाला होता. या डावात भारताकडून वृंदा दिनेशनं सर्वाधिक धावा केल्या. तिनं २० चेंडूत ४२ धावा केल्या आणि टीम इंडियाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. या स्पर्धेचा अंतिम सामना २२ फ ेब्रुवारी रोजी खेळवला जाईल. या सामन्यात टीम इंडिया पाकिस्तान किंवा बांगलादेशशी सामना करु शकते. या दोघांमधील सेमीफायनल सामना अजून खेळायचा आहे.

# २२ व्या वर्षी लग्न, १५ महिने कोर्टाच्या फेऱ्या मारल्यानंतर फिरकीपटूचा संसार मोडला



**नवी दिल्ली:** भारताचा स्टार फिरकीपटू राहुल चाहरने पोस्ट शेअर करून पत्नीसोबत घटस्फोट घेत नसल्याची घोषणा केली आहे.

: भारतीय संघाचा स्टार फिरकीपटू राहुल चाहरने सोशल मीडिआ अकाऊंटवर पोस्ट शेअर करून आपल्या वैयक्तिक आयुष्याबद्दल एक मोठी अपडेट दिली आहे. रा- हुल चाहरने आपली पत्नी ईशानी जौहरपासून घटस्फोट घेत असल्याची माहिती दिली आहे. त्याने ही माहिती आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर पोस्ट शेअर करून दिली आहे. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर दोघांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला आहे. राहुल आणि ईशानी या दोघांचा ९ मार्च २०२२ चा गोव्यात थाटामाटात विवाह सो- हळा पार पडला होता. आता ४ वर्षांचा संसार केल्यानंतर दोघांनी वेगळं होण्याचा निर्णय घेण्याचा निर्णय घेतला आहे.

राहुल चाहर गेल्या काही वर्षांपासून भारतीय संघातून बाहेर आहे. त्याला सुरूवातीला भारतीय संघाकडून काही सामने खेळण्याची संधी मिळाली होती. पण एकदा संघाबाहेर झाल्यानंतर तो भारतीय संघात पुन्हा पुनरागमन करू शकलेला नाही. राहुल चाहर २६ वर्षांचा आहे. वयाच्या २२ वर्षी त्याने ईशानीसोबत विवाह केला होता. राह- ुल चाहरने पोस्ट शेअर करून हे मान्य केलं की, ज्यावेळी त्याचं लग्न झालं त्यावेळी तो लहान होता. त्यावेळी त्याला काही गोष्टी कळत नव्हत्या. गोव्यात दोघांचा विवाह मोठ्या थाटामाटात पार पडला होता. या विवाह सोहळ्याला दीपक चाहरसह कुटुंबातील सदस्यांनी आणि स्टार खेळाडूंनी देखील हजेरी लावली होती. ज्यावेळी त्याचं लग्न झालं, त्यावेळी त्याच्या लग्नाची जोरदार चर्चा रंगली होती. कारण वयाच्या २२ व्या वर्षी तो आयपीएलमध्ये दमदार फॉर्ममध्ये होता. आयपीएलमध्ये चांगली काम गिरी केल्यानंतर त्याने भारतीय संघात स्थान मिळवलं होतं.

राहुल चाहरने आपल्या पोस्टमध्ये काय लिहिलं?

राहुल चाहरने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर भावूक करणारी पोस्ट शेअर केली आहे. ङ्गगेले १५ महिने हे न्यायालयाच्या फेऱ्या मारण्यात, संयम, चिकाटी आणि सत्यातून मि ळणारी ताकद शिकण्यात गेले. आज माझ्या आयुष्यातील हा धडा संपत आहे. योग्य कायदेशीर प्रक्रियेनंतर, हे प्रकरण आता मिटले आहे. ज्यासाठी मला मोठी किंमत मोजावी लागली आणि माझ्या आयुष्यातील या कठीण काळाचा अखेर शेवट झाला आहे. मी हे प्रकरण राग किंवा पश्चात्तापाने नाही, तर अत्यंत स्पष्टतेने संपवत आहे.

## सॅमसंग इंडियाने त्यांच्या आगामी AI स्मार्टफोनच्या प्री-रिझर्व्हेशनवर विशेष फायद्यांची घोषणा केली आहे

**मुंबई/प्रतिनिधी :** ठळक मुद्दे: विशेष ऑफर: प्री-रिझर्व्ह करणाऱ्या ग्राहकांना मोफत मेमरी अपग्रेड मिळेल (२५६ जीबी वरून ५१२ जीबी). इव्हेंटची तारीख: सॅमसंगचा हा नवीन AI फोन २५ फेब्रुवारी रोजी सॅन फ्रान्सिस्को येथील 'गॅलेक्सी अनपॅक्ड' (Galaxy Unpacked) इव्हेंटमध्ये लाँच केला जाईल.

प्री-रिझर्व्हेशन प्रक्रिया: ग्राहक ९९९ रुपयांची परतावायोग्य (refundable) रक्कम भरून २५ फेब्रुवारीपर्यंत नवीन गॅलेक्सी एस (Galaxy S) सिरीज प्री-रिझर्व्ह करू शकतात.

कुठे उपलब्ध: ग्राहक Samsung.com, सॅमसंग एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स, Amazon.in, Flipkart.com आणि भारतातील प्रमुख रिटेल आउटलेट्सद्वारे प्री-रिझर्व्हेशन करू शकतात.

अतिरिक्त फायदे: स्टोरेज अपग्रेडशिवाय, प्री-रिझर्व्ह करणाऱ्या ग्राहकांना फोन खरेदी करताना २,६९९ रुपयांचे अतिरिक्त फायदे देखील मिळतील. ही नवीन गॅलेक्सी एस सिरीज दैनंदिन व्यवहार सुलभ करण्यासाठी आणि गॅलेक्सी एआय (Galaxy AI) चा अखंड अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

## मुक्त विद्यापीठ माजी विद्यार्थी संघाच्या निबंध स्पर्धेत हेमंत पाटकर, डॉ. सीमा कांबळेसह डॉ. विजय बागुल प्रथम

नाशिक (प्रतिनिधी): यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघाच्या पाचव्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने राज्यस्तरीय खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात हेमंत पाटकर (सिंधुदुर्ग), डॉ. सीमा कांबळे - सादळेकर (रायगड), डॉ. विजय बागुल (नाशिक) हे प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले आहेत.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष तथा प्रभारी कुलसचिव व वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे यांच्या नियोजनानुसार विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेण्यात आली. त्यासाठी महिलांच्या सबलीकरणात मुक्त विद्यापीठाचे स्थान, ज्ञानगंगा घरोघरी नेणारे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, मुक्त विद्यापीठातून घेतलेल्या शिक्षणाची माझ्या दैनंदिन जीवनातील उपयुक्तता, मुक्त विद्यापीठामुळे शिक्षणाच्या खुल्या झालेल्या संधी, मुक्त विद्यापीठातून प्रौढांच्या शिक्षणाची स्वप्नपूर्ती आणि मुक्त व दूरस्थ शिक्षणामधील कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर (AI) असे विषय होते. त्यात राज्यभरातील ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

स्पर्धेत द्वितीय क्रमांक श्री. कुणाल कासार (नाशिक), डॉ. मंजूश्री नेव्हल (नाशिक) व डॉ. विनायक लोहार (रायगड) यांनी तर तृतीय क्रमांक श्रीमती आशा नळे (लातूर) आणि विजय अहिरराव (नाशिक) यांनी संयुक्तरित्या पटकावला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. प्रवीण घोडेस्वार, प्रा. सुभाष सोनुने, डॉ. पूनम वाघ आणि प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांनी काम पाहिले.

विजेत्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र. कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या प्रा. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव व वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे आदींनी अभिनंदन केले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना लवकरच समारंभपूर्वक गौरवण्यात येईल अशी माहिती माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस डॉ. संतोष साबळे यांनी दिली आहे.

## शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** रॉयल एज्युकेशन सोसायटी संचलित शारदा सेमी इंग्लिश स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थाध्यक्ष डॉ.एम.आर. पाटील सर व उपाध्यक्ष श्री एल.एम. पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शाळेचे प्राचार्य श्री एल. टी. पुरी सर यांच्या नियोजनाखाली संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या कार्यावर आधारित प्रभावी भाषणे, पोवाडे व पाळणा गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमासाठी शाळेचे प्राचार्य श्री लक्ष्मण पुरी सर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती शौर्य आणि स्वाभिमानाची भावना जागृत झाली.

कार्यक्रमास माध्यमिक,प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाच्या समन्वयीका मानसी पाटील, अश्विनी पवारव वर्षा कांबळे , श्री.रोहित जाधव व मीनाक्षी सूर्यवंशी, तसेच सर्व शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी शिवरायांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प केला. अशा प्रकारे शिवजयंती उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# श्री सिध्देश्वर मंदिरात होणार संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज यांच्या पादुकांचे पुजन

### मंदीर परिसरात हेलिकॉप्टरने होणार पुष्पवृष्टी : भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज शष्टशतकोत्तर अमृत महोत्सवी संजिवनी समाधी सांगता, श्री संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर जन्मोत्सव सांगता सोहळा आणि जगद्गुरु तुकाराम महाराज त्रिशकतोत्तर अमृत महोत्सवी वैकुंठगमन सांगता सोहळा अशा त्रिवेणी संगमाचे औचित्य साधून लातूर येथे आज शनिवार दि. २१ रोजी संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज व संत जनाबाई यांच्या पादुकांचे आगमन होणार आहे. सकाळी ९ वाजता सिध्देश्वर मंदीरात या पादूका येणार असून यावेळी हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत पादुकांचे पुजन होणार आहे. याप्रसंगी मंदीर परिसरात हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी होणार असून या सोहळ्यास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर यांनी केले आहे.

श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज शष्टशतकोत्तर अमृत महोत्सवी संजिवनी समाधी सांगता, श्री संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर जन्मोत्सव सांगता सोहळा आणि जगद्गुरु तुकाराम महाराज त्रिशकतोत्तर अमृत महोत्सवी वैकुंठगमन सांगता सोहळ्यानिमित्त लातूरात वारकयांचा मेळा भरणार आहे. या निमित्ताने संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज व संत जनाबाई यांच्या पादुकांचे आगमन शनिवार दि. २१ फेब्रुवारी रोजी हेलिकॉप्टरने होणार आहे. सर्वप्रथम या पादुका लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर मंदिरात सकाळी ९ वाजता येणार आहेत. यानिमित्ताने या पादुकांचे पुजन देवस्थानच्या वतीने करण्यात



सद्गुरु श्री.गुरुबाबा महाराज औसेकर.

येणार आहे. या सोहळ्यासाठी लातूर जिल्ह्यासह राज्यभरातील विविध साधु, संत व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तसेच यावेळी ह.भ.प. छोटे कदम माऊली, देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर, जिल्हा पोलिस अधिक्षक अमोल तांबे यांच्यासह मंदीराचे विश्वस्त यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पादुकांचे पुजन होत असताना मंदीर परिसरात हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी होणार आहे. या सोहळ्या निमित्ताने देवस्थानच्या वतीने पुजन सोहळ्यासाठी उपस्थित असणाया वारकयांसह भाविक भक्तांना अल्पोपहाराची सोय करण्यात आली आहे.

या सोहळ्यात लातूर शहरासह परिसरातील भाविक भक्तांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्यासह विश्वस्त विक्रम गोजमगुंडे, नरेश पंड्या, श्रीनिवास लाहोटी, प्रदीप राठी, मन्मथप्पा लोखंडे, अशोक भोसले, बाबासाहेब कोरे, सुरेश गोजमगुंडे, रमेशसिंह बिसेन, चंद्रकांत परदेशी, व्यंकटेश हालिंगे यांनी केले आहे.

**गुरुबाबा महाराज औसेकर यांचे चक्रीभजन**

श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर यात्रा महोत्सवाच्या वतीने मंदीर परिसरात किर्तन व भजन संध्येचा कार्यक्रम दररोज संपन्न होत आहे. या कार्यक्रमांतर्गत आज शनिवार दि. २१ रोजी सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान औसा येथील ह.भ.प. गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या चक्रीभजनाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुबाबा महाराज यांचे चक्रीभजन केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर आंध्रप्रदेश व कर्नाटकातही प्रसिध्द आहे. या भजन सोहळ्यात भाविक भक्त तल्लीन झाल्याचे पहावयास मिळातात. सिध्देश्वर मंदीरात होणाया या चक्रीभजनास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन देवस्थत्तान प्रशासक जांबुतकर यांच्यासह विश्वस्तांनी केले आहे.

## तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरला मूल्यांकनात अ+ श्रेणी; लातूर जिल्ह्यात मिळविला पहिला मान

**लातूर/प्रतिनिधी :**महाराष्ट्र शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली होती. राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांसाठी गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडचाची 'एसक्यूएएएफ'ची निर्मिती करण्यात आली होती. या मूल्यांकनात राज्यातून अंबिका बहुउद्देशिय महिला मंडळ, रोहिणा द्वारा संचलित लातूरच्या तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरला अ+ श्रेणी प्राप्त झाली आहे. तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरने या मूल्यांकनात लातूर जिल्ह्यात पहिला मान मिळविला आहे.



२०२४-२५ मध्ये राज्यातील १०२६७५ शाळांनी स्वयंमूल्यांकन पूर्ण केले. यानुसार राज्य शैक्षणिक मूल्यांकन पथकाद्वारे शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची तपासणी व पडताळणी करण्यात आली होती. यानुसार स्वयंमूल्यांकनात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांपैकी २०२५ व २६ या वर्षात १०७१२ शाळांची बाह्य मूल्यांकन करण्यासाठी निवड करण्यात येऊन त्यापैकी १०६४४ शाळांचे बाह्य मूल्यांकन पूर्ण करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्र शासन निर्णयातील क प्राधिकरणाची कार्यपध्दती व कार्य यामध्ये बाह्य मूल्यांकनासाठी त्रयस्थ पक्षाद्वारे मूल्यांकन पूर्ण करण्यात आले. यांच्या मूल्यांकनानंतर मिळालेल्या श्रेणीमध्ये लातूर जिल्ह्यातून प्रथम अंबिका बहुउद्देशिय महिला मंडळ, रोहिणा द्वारा संचलित लातूरच्या तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरला अ+ श्रेणी प्राप्त झाली आहे. तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिराचे शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याचे काम मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या यशाबद्दल माजी मंत्री आमदार अमित देशमुख, शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षण उपसंचालक दत्तात्रय मठपती, सहसंचालक संजय पंचगल्ले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तृप्ती अंधारे, गटशिक्षणाधिकारी सी. आर. शेख, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी एन. एम. जांभळदरे, केंद्र प्रमुख नंदा आचार्य, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेच्या अध्यक्षा करिश्मा केंद्रे, सचिव के. ए. जायेभाये, सहसचिव तथा मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, सदस्य कविता केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, राजीव मुंढे, प्रा. डॉ. गणेश नागरगोजे यांनी कौतुक केले आहे.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या ओद्योगिक रसायनशास्त्र विभागाची शैक्षणिक सहल



**लातूर/प्रतिनिधी :**येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील औद्योगिक रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी नॅचरल शुगर व अलाईड प्रॉडक्ट रांजणी,जिल्हा धाराशिव येथील साखर कारखाना व नॅचरल दुध डेअरीला शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून दि.१७ फेब्रुवारी २०२६ रोजी भेट दिली.महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिध्देश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल आयोजित करण्यात आलेली होती.

या सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी ऊसापासून साखर निर्मिती व इतर घटक जसे की, विजनिर्मिती, सी. एन. जी, बायोगॅस, इथेनोल निर्मिती कश्या प्रकारे होते ते पाहिले व तसेच तेथील वेगवेगळ्या युनिटला भेट दिल्ली. त्यामध्ये बॉयलर, क्रीस्टलायझेशन प्रोसेस,इवॅपोरेशन आणि अल्कोहोल निर्मिती कशाप्रकारे होते, बायोगॅसचा वापर करुन प्रदुषणावर नियंत्रण व त्याच्या बायप्रॉडक्टचा वापर करुन गंधकयुक्त खते निर्मिती यामुळे इतर रासायनिक खताचा वापर व त्यावर होणारा पैशाचा अपवय टाळता येतो.ही खते शेतकऱ्यांना खुप कमी दरामध्ये देऊन शेतकऱ्यांचा विकास करता येऊ शकतो,त्याचेही महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

औद्योगिक रसायनशास्त्र विभागामार्फत घेतला जाणारा अँड ऑन कोर्स एअर क्वालिटी मॉनीटरींग कोर्स या अंतर्गत हवेचे प्रदुषण जागरुकता या अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रा.राहुल जाधव व सेफटी इनचार्ज श्री गुज्जर ए. यू. यांनी साखर कारखान्याच्या साखर निर्मिती व पर्यावरण प्रदूषण व व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांनी रांजणीच्या नॅचरल दूध डेअरी प्रकल्पाला भेट दिली व दुधाचे पाश्चरायजेशन, दुधापासून दही, तुप, लोणी, श्रीखंड, आइस्क्रीम कशाप्रकारे बनवतात याचे धडे घेतले. त्यानंतर येडशी येथील रामलिंग देवस्थानाला भेट घेऊन तेथील निसर्ग पाहणी केली. या सहलीसाठी नॅचरल शुगरचे संचालक बी.बी.ठोंबरे तसेच औद्यौगिक रसायनशास्त्र विद्यार्थी मंडळाचे सर्व पदाधिकारी, सांळुके भक्ती, सायली क्षीरसागर, अंकिता जाधव, जाधव बळवंत, काळे प्रेरणा, दाताळ साक्षी, पाटील प्रांजली, बाचपल्ले ऋशिकेष,व शिंदे मॅडम, रवी बाजपाई यांनी परिश्रम घेतले.

# शिवजयंती निमित्त शिऊरकरांना दिले जीवन

### – गावाला दिली विंधन विहिर भेट – शिवप्रतिष्ठानच्या तरुणांचा स्तुत्य उपक्रम

### – संगमेश्वर शिक्षण मंडळ व युवा उद्योजकाने केले अन्नदान

**लातूर/प्रतिनिधी :** शिवजयंती म्हटले की जल्लोष, डीजेचा आवाज, मिरवणूका, मोटारसायकल रॅली पण निलंगा तालुक्यातील शिऊर गावात शिऊर गावात एक आगळा वेगळा स्तुत्य सामाजिक उपक्रम राबवविण्यात आला आहे. पाणी प्रश्न लातूर जिल्ह्यात सातत्याने गंभीर असतो. पाणी हे जीवन आहे.. याचे सामाजिक भान ठेवून शिवप्रतिष्ठानने शिवजयंती निमित्त शिऊर गावात विंधन विहीर घेऊन ती गावाकऱ्यांना गिफ्ट केली. विशेष म्हणजे या विंधन विहिरीला चक्क ४ इंच

इतके पाणी लागले आहे. त्यामुळे शिऊरकरांना जीवन मिळाले आहे.

उन्हाळ्यातल्या पाणी टंचाईवर त्यांना आता मात करता येणार आहे. यावेळी संगमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे आशिष शिवराज आष्टुरे आणि युवा उद्योजक गोपाळ पाटील यांनी गावकऱ्यांना अन्नदान करून छत्रपती शिवरायांचा जयघोष करीत शिवजयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला. विंधन विहिरीतून येणाऱ्या पाण्याच्या फवाऱ्यामुळे गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद ओसंडून वाहत होता. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. निलंगा तालुक्यातील शेवटचे टोक म्हणजे शिऊर गाव. येथील शिवप्रतिष्ठान नवतरुण मंडळाने यंदा एक वेगळाच आदर्श समाजासमोर ठेवला आहे. मिरवणुकीवर होणारा लाखो रुपयांचा खर्च टाळून मंडळाने गावात पिण्याच्या पाण्यासाठी विंधन विहीर खोदून गावाची तहान भागवण्याचा संकल्प पूर्ण केला आहे. शिवजयंतीच्या या अनोख्या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.

शिवप्रतिष्ठानच्या तरुणांनी कुठलाही बडेजाव टाळून समाजहिताला प्राधान्य दिले आणि सामाजिक बांधिलकी जोपासली.- दरवर्षी मंडळाच्या वतीने मिरवणुकीवर मोठा खर्च केला जायचा. मात्र, यंदा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत डीजेच्या तालावर नाचण्यापेक्षा ग्रामस्थांची तहान भागवायचा निर्णय घेतला. शिवजयंती





उत्सवाचा निधी गोळा करून गावात एका मोक्याच्या ठिकाणी विंधन विहीर खोदण्यात आली. या विंधन विहीरीचे भूमिपूजन भारतीय सैन्य दलातील सेवानिवृत्त ले.कर्नल सचिन रंडाळे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. शोर्य चक्र व सेना पदक मिळालेले ले. कर्नल सचिन रांडळे आणि कीर्ती चक्र पदक विजेते सुभेदार संतोष राळे यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दोन्हीही लष्कर अधिकाऱ्यांनी शिऊरच्या तरुणाचे सदर उपक्रमाबद्दल कौतुक केले.

सुभेदार संतोष राळे यांनी सैन्यातील आपले अनुभव कथन करून त्यांनी व त्यांच्या टीमने १८ अतिरेक्यांचा कसा खात्मा केला ते विशद केले. त्यांचे प्रेरणादायी असे भाषण झाले. केवळ एक दिवसाचा उत्सव न करता गावाला कायमस्वरूपी पाण्याची सोय करून दिली. ध्वनी आणि वायू प्रदूषणाला पूर्णपणे फाटा दिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे हित जपले, तोच वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न या गावचा तरुण वर्ग करत आहे.

## जीवातून जीवोत्पत्ती: फ्रान्सिस्को रेडी आणि एका भ्रमाचा अंत

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद विज्ञान महाविद्यालयात १८ फेब्रुवारी २०२६ रोजी, फ्रान्सिस्को रेडी यांच्या ९० व्या जयंतीनिमित्त लुमिनार्या व्याख्यानमाला अंतर्गत विशेष वैज्ञानिक सेमिनार आयोजित करण्यात आले. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

सेमिनारची सुरुवात विभाग प्रमुख प्रा. अवंती बिडकर यांच्या हस्ते फ्रान्सिस्को रेडी यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर बी.एस्सी. जैवतंत्रज्ञान प्रथम वर्षातील विद्यार्थी रोहित साबळे यांनी रेडी यांच्या जीवनप्रवास आणि वैज्ञानिक योगदानावर सविस्तर प्रकाश टाकला.

फ्रान्सिस्को रेडी यांचे वैज्ञानिक योगदान: रेडी यांनी प्रायोगिक जीवशास्त्र क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांनी सिद्ध केले की कुजलेल्या मांसावर तयार होणाऱ्या अळ्या ही बाहेरून आलेल्या माश्यांच्या अंड्यांमधून निर्माण होतात.

प्रयोग: काही मांस उघड्या भांड्यात ठेवले, काही बंद भांड्यात, तर काही जाळीदार कापडाने झाकलेल्या भांड्यात ठेवले.

परिणाम: केवळ उघड्या भांड्यातील मांसावर माश्या बसल्या आणि अळ्या तयार झाल्या.

या प्रयोगामुळे जीवशास्त्रात नियंत्रित प्रयोग ( ) पद्धतीची संकल्पना रुजू झाली.रेडी यांनी विषारी सापांच्या विषावरही संशोधन केले आणि परजीवीशास्त्र() क्षेत्रात



महत्त्वपूर्ण योगदान दिले.

रेडी यांनी पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढण्याची पद्धत विकसित केली, ज्यामुळे त्यांना आधुनिक जीवशास्त्राचे पायाभूत शास्त्रज्ञ मानले जाते. त्यांच्या प्रयोगशाळेतील कार्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्क्रांती सिद्धांताविषयी सखोल समज, चिकित्सक विचारशक्ती, संशोधन वृत्ती आणि जैवविविधतेच्या संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण झाली.याप्रसंगी प्रा. ऋतुजा डिग्रसकर, प्रा. तृप्ती सोनकांबळे, प्रा. आऊ येळीकर आणि इतर प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मंदिर प्राणप्रतिष्ठापना हा भारतीय संस्कृती, मूल्यांचा आणि श्रद्धेचा उत्सव

## एमआयटीत मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व 'विश्वमैदान' लोकार्पण सोहळा; डॉ. गोपाळराव पाटील यांचे प्रतिपादन

**लातूर/प्रतिनिधी :** प्राणप्रतिष्ठापना म्हणजे दगडामध्ये प्राण फुंकणे नव्हे, तर आपल्या अंतःकरणात श्रद्धा, करुणा आणि सद्भावना जागवण्याची प्रक्रिया होय. श्री गणेश, श्री महालक्ष्मी व श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिरांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण हा केवळ धार्मिक विधी नसून भारतीय संस्कृती, मूल्ये आणि श्रद्धेचा उत्सव आहे, असे प्रतिपादन शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांनी केले.



माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने आयोजित श्री गणेश, श्री महालक्ष्मी, श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिरांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा तसेच 'विश्वमैदान' क्रीडा संकुल लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ममता हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. मधुकर कुलकर्णी, सह-अध्यक्षा डॉ. माया कुलकर्णी, मृदंगाचार्य उध्दवबापू आप्पेगावकर, कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे समन्वयक पृथ्वीराज कराड, संचालक प्रा. तेजस कराड, डॉ. देवेंद्र कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री हे उपस्थित होते.

एमआयटीच्या प्रांगणातील मंदिररूपी संस्कार विद्यार्थ्यांना आत्मचिंतन, मूल्यांची जाणीव आणि सकारात्मकतेची प्रेरणा देतील. या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाबरोबरच करुणा, सद्भावना व विश्वबंधुत्वाची भावना दृढ व्हावी, तसेच एमआयटी समूहातून घडणारी प्रत्येक पिढी समाज, देश आणि विश्वशांतीसाठी कार्य करणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त करून पुढे डॉ. पाटील म्हणाले की, ज्ञान-श्रद्धा, विज्ञान-संस्कृती, आधुनिकता-परंपरा यांचा समन्वय साधण्याचा संदेश या सोहळ्यातून देण्यात येत आहे.

एमआयटीची स्थापना करताना प्रा. विश्वनाथ कराड यांनी केवळ अभियंते, डॉक्टर किंवा व्यावसायिक नव्हे तर सुजाण, संवेदनशील आणि जागतिक दृष्टिकोन असलेली पिढी घडवण्याचा संकल्प केला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. राहुल कराड, आ. रामेशअप्पा कराड व डॉ. हनुमंत कराड यांच्या नेतृत्वाखाली एमआयटी समूह यशस्वीपणे पुढे जात असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. प्रा. विश्वनाथ कराड हे विश्वशांतीचे प्रखर पुरस्कर्ते असून विविध देशांतील शांतता उपक्रम व जागतिक परिषदांव्दारे त्यांनी 'विश्व कुटुंब' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार केली, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना डॉ. माया कुलकर्णी म्हणाल्या की, प्राणप्रतिष्ठापना सोहळा हा मानवी जीवनातील सद्भावना, सदाचार आणि सत्यानिष्ठा यांचा स्वीकार करण्याची प्रेरणा देणारा आध्यात्मिक उत्सव आहे. डॉक्टर रुग्णावर उपचार करतो; मात्र अंतिम आरोग्य देण्याचे कार्य देव करीत असतो. मानवी क्षमतेची मर्यादा संपल्यानंतर पुढील जबाबदारी परमेश्वरावर सोपविली जाते. मनःशांतीसाठी देवाचे नामस्मरण आवश्यक असून तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात प्रगतीसोबत मानवतेचे जतन करणे तितकेच महत्त्वाचे आहे. विज्ञान व अध्यात्म यांचा समतोल राखल्यास समाज अधिक संवेदनशील व मूल्यनिष्ठ बनेल, असे त्यांनी सांगितले.

डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, आजचा दिवस केवळ एका कार्यक्रमाचा प्रारंभ नसून एका महान संस्कारयात्रेचा आणि स्वप्नपूर्तीचा क्षण आहे. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर शरीर, मन आणि आत्म्याचा सर्वांगीण विकास हा प्रा. विश्वनाथ कराड यांचा विचार आमच्यासाठी जीवनमंत्र आहे. गेल्या २५ वर्षांच्या प्रवासात अनेक आव्हाने आली; मात्र वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद व सहकाऱ्यांच्या निष्ठेमुळे संस्था प्रत्येक संकटावर मात करू शकली. एमआयटी ही संस्था पद नसून एक साधना असल्याची भावनिक भावना त्यांनी व्यक्त केली.

प्रारंभी विधीवत पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर एमआयटी शिक्षण संकुल परिसरात मंदिर कलशांची रथाव्दारे शोभायात्रा काढण्यात आली. तद्नंतर मान्यवरांच्या हस्ते फित कापून 'विश्वमैदान' क्रीडा संकुलाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी देवतांचे व यज्ञपूजनही पार पडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परमेश्वर सोनवणे यांनी केले, तर आभार डॉ. सुभाष खत्री यांनी मानले. या कार्यक्रमास शिक्षक, डॉक्टर, कर्मचारी, विद्यार्थी व परिसरातील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात गणित विषयाची विभागीय स्पर्धा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** मराठवाडा मॅथेमॅटिकल सोसायटी, छत्रपती संभाजीनगर आणि एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमानाने '२२ व्या रिजनल लेव्हल सेमिनार ऑन मॅथेमॅटिक्स अँन्ड इट्स एप्लिकेशन्स' या स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. लातूर, नांदेड आणि धाराशिव या तीन जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठीची स्पर्धा यावर्षी बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्घाटन प्रा. डॉ. एम. एस. वावरे राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. एस एस कुलकर्णी आणि प्रा. डॉ. एस. एस. फुलसागर यांनी जवाबदारी पार पाडली. मराठवाडा मॅथेमॅटिकल सोसायटी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून स्पर्धेसाठी यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आले.

या स्पर्धेत राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील मुरकुटे ए. डी. या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला. तर द्वितीय क्रमांक एम. जी. महाविद्यालय, अहमदपूर येथील विद्यार्थिनी थाटे वैष्णवी, तृतीय क्रमांक महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथील आशिष शिंदे आणि उत्तेजनार्थ पारितोषिक महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथील ओम उगले व दयानंद सायन्स महाविद्यालय, लातूर येथील हुंबे एस. बी. या विद्यार्थ्यांनी पटकावले.

पारितोषिक वितरण व समारोपाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. जे. ए. ननावरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. एस. एस. फुलसागर, प्रा. डॉ. एम. व्ही. बुके तसेच प्रा. डी. आर. बिरादार यांनी स्पर्धेतील विद्यार्थ्यांच्या सहभागाबद्दल मत मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धेचे आयोजक गणित विभाग प्रमुख प्रा. डॉ. एन. जी. पाटील यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस. एम. जगदे आणि प्रा. डॉ. जे. ए. ननावरे यांनी स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. एम. व्ही. नष्टे यांनी केले, तर प्रा. जी. सी. शाबादे यांनी आभार मानले. यावेळी परिसर संचालक प्रा. डॉ. एम. व्ही. बुके, उपप्राचार्य प्रा. व्ही. एस. बाळे, निबंधक प्रा. डॉ. जे. एस. हत्ते , प्रा. डी. आर. बिरादार, प्रा. ए. आर. माका, प्रा. डी. के. कोकरे, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. एस. आर. बिराजदार प्रा. टी. एस. सोनावणे , प्रा. पी. पी. कोरे यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या स्पर्धेत निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजय रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक राजेश्वर बुके, बसवराज येरटे, काशिनाथ साखरे, ललिता पांढरे, महेश हलगे, बाबूराव तरगुडे, प्रा. गुरुलिंग धाराशिवे यांनी अभिनंदन केले आहे.

# डेटा ॲनालिसिस विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथील पीजी प्रोजेक्ट रिसर्च कमिटीच्या वतीने दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी सेमिनार हॉलमध्ये डेटा ॲनालिसिस विषयावर एकदिवसीय प्रत्यक्ष (ऱ्पवी-प) प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी.एम. मान्नीकर हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथील सांख्यिकी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अतुल विराज वडागळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी डेटा ॲनालिसिसचे महत्त्व, संशोधनातील त्याची उपयुक्तता तसेच प्रत्यक्ष उदाहरणांसह विविध सांख्यिकी तंत्रांची माहिती दिली. आधुनिक संशोधनासाठी डेटा व्यवस्थापन व विश्लेषण कौशल्ये अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. जी. आर. लहाने यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. बी.जी. कळंबे यांनी केली. प्रमुख अतिथी भाषण डॉ. अतुल विराज वडगाळे यांनी केले . कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा.ऐश्वर्या कुलकर्णी व प्रा.साक्षी पाटील यांनी कार्य पाहिले. सूत्रसंचालन दुर्गेश्वरी व्यावहारे (एम.कॉम. विद्यार्थीनी) यांनी केले. आभार प्रदर्शन यश मेकेवाड (एम.कॉम. विद्यार्थी) यांनी केले. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या संशोधन कौशल्यात भर पडून भविष्यातील प्रकल्प कार्य आणि संशोधन कार्य अधिक सक्षमपणे पूर्ण करण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

## फाईल ..

सुस्तावलेली फाईल
आधीची गोगलगाय
काय झालं अवचित
फुटले असंख्य पाय

कसा वर्णावा वेग रे
भरारा पळतचं जाय
दफ्तर दरबार तत्पर
अरेकेली जादु काय

कुणी म्हणे कुठे तरी
वाटायलेलागले साय
फायदा घेई संधीचा
नंतर नको हाय हाय

डोळे मिटले लज्जेने
मांजरी मलिदा खाय
वाटतेसगळे निदीस्त
रे कुणांसकळत नाय

सह्या होती फटाफट
शाई ना होणारं ड्राय
दिवस करत रात्रीचा
विचारू नकातव्हाय

लफडी येताचं बाहेर
हो रडारड धाय धाय
त्राही माम् म्हणायचे
चाटायलेलागत पाय

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# परीक्षा केंद्रांवर अपर पोलीस अधीक्षकांच्या भेटी; दहावीच्या परीक्षेसाठी कडक पोलीस बंदोबस्त

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ आयोजित इयत्ता दहावी (SSC) मुख्य लेखी परीक्षा दिनांक २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत जिल्हाभरात पार पडत आहे. सदर परीक्षा पूर्णतः शांत, सुरक्षित, कॉपीमुक्त व निर्विघ्न वातावरणात पार पाडण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाने व्यापक नियोजन करून मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या स्पष्ट निर्देशांनुसार प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परीक्षा केंद्रांवर आवश्यक तेवढा पोलीस बंदोबस्त देण्यात आला असून संबंधित ठाणे प्रभारी अधिकारी व पोलीस निरीक्षक स्वतः परीक्षा केंद्रांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेत आहेत.

अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी देखील विविध परीक्षा केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन बंदोबस्ताची पाहणी केली. संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या असून कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**कॉपीमुक्त व तणावरहित वातावरणासाठी उपाययोजना**

परीक्षा केंद्र परिसरात अनावश्यक गर्दी होऊ नये, पालकांनी शिस्त पाळावी, संशयास्पद व्यक्तींवर लक्ष ठेवावे, तसेच अफवा पसरविणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. परीक्षा काळात वाहतुकीचे योग्य नियोजन करून विद्यार्थ्यांना वेळेत केंद्रावर पोहोचता यावे यासाठीही विशेष काळजी घेतली जात आहे. पोलिसांकडून खालील उपाययोजना राबविण्यात येत आहेत –




*परीक्षा केंद्र परिसरात नियमित गस्त व सतत नजर.

* संवेदनशील केंद्रांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त.

* संशयित हालचालींवर तात्काळ कारवाई.

* परीक्षा केंद्र प्रमुखांशी समन्वय ठेवून माहितीची देवाणघेवाण.

लातूर पोलीस दलाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले असून परीक्षा काळात कोणताही अनुचित प्रकार, गैरप्रकार, कॉपी, पेपर फुटी किंवा कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणारी घटना घडू नये यासाठी सज्जता ठेवली आहे.जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर समन्वय, सतर्कता आणि जबाबदारीची जाणीव ठेवून पोलीस अधिकारी व अमलदार कार्यरत आहेत. परीक्षा प्रक्रियेला कोणतेही गालबोट लागू नये, यासाठी सर्व स्तरांवर काटेकोर खबरदारी घेतली जात आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

The Executive Engineer (EHV O&M Division) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| Sr.No. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 1 | Work of Annual Maintenance Contract of Overhauling/ Servicing with spares for 33 KV & 11 KV CGL Make CB at various S/s under EHV O&M Division, Latur. | EE/EHV/O&M/LTR/TS/ 2025-26/T-11 | 7000038799 |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person:** The ADEE (O) Phone No. +918956304921.
The DYEE (O) Phone No. +918554995271.
The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Division Latur**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

The Executive Engineer (EHV O&M Division) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| Sr.No. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 1 | Work of Annual Maintenance Contract for Overhauling/ Servicing with spares for 33 kV & 11 kV ALSTOM/AREVA Make CB at various S/s under EHV O&M Dn. Latur. | EE/EHV/O&M/LTR/TS/ 2025-26/T-10 | 7000038690 |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person:** The ADEE (O) Phone No. +918956304921.
The DYEE (O) Phone No. +918554995271.
The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Division Latur**



टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग



निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६